# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक २६/२/२००९ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२४) इतिवृत्त

**बुधवार,** दिनांक **२६ फेब्रुवारी २००९ रोजी** स्थायी समितीची सभा, माननीय सभापती **श्री. अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महापालिकेच्या मुख्य कार्यालयातील **"मलीक अंबर स्थायी समिती सभागृह"** येथे **दुपारी ४.३० वाजता** "वंदे मातरम्" या गिताने सुरू झाली. या सभेला मा. प्र.आयुक्त श्री.उध्दव घुगे, नगर सचिव श्री. एम. ए. पठाण यांचेसह संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे सन्माननीय सदस्य उपस्थित होते.

१. श्री. अ. रशीद खान मामु
२. श्री. मोहन धन्नुलाल मेघावाले
३. श्री. दत्ताभाऊ पाथ्रीकर
४. सौ. अल्पा विकास जैन
५. श्री. संजय रामदास जोशी
६. श्रीमती जयश्री किवळेकर
७. श्री. सतीश विश्वनाथ कटकटे
८. श्री. रविकांत काशीनाथ गवळी
९. श्रीमती मोमीन सफिया फिरदोस
१०. श्री. कचरू श्रीपत सोनवणे
११. श्री. कचरू विश्वनाथ मोरे
१२. श्री. सिताराम इसराम सुरे
१३. श्री. नारायण कुचे

**संवाद :**

श्री.संजय जोशी : मराठवाडयाचे सुपूत्र स्वर्गवासी श्री.लक्ष्मण देशपांडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांना सभागृहाच्या वतीने श्रध्दांजली वाहण्यात यावी.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : श्रध्दांजली वाहण्यात यावी.
श्री.रशिद मामु.
श्री.रविकांत गवळी

मा.सभापती : सभागृहाच्या वतीने श्री.लक्ष्मण देशपांडे यांना दोन मिनट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात यावी.

(सभागृहाच्या वतीने श्री.लक्ष्मण देशपांडे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.)

मा.सभापती : सभागृहाच्या वतीने श्री.लक्ष्मण देशपांडे यांना दोन मिनट स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात यावी.

(सभागृहाच्या वतीने श्री.लक्ष्मण देशपांडे यांना श्रध्दांजली वाहण्यात आली.)

श्री.अ.रशिद मामु : कित्येक मजुर असे आहेत की त्यांचा मृत्यु होउन तिन ते चार महिणे झालेले आहे अजून पर्यंत इशुरन्सचे पैसे मिळालेले नाही. मागील बैठकीत सांगण्यात आले होते की संबधीत अधिकारी यांनी पुढील बैठकीत उपस्थित रहावे तसेच श्री.जाधव मुख्य लेखापरिक्षक यांना चौकशीसाठी नेमले होते त्याबाबतीत काय झाले खुलासा करण्यात यावा.

मुख्य लेखापरिक्षक : चौकशी प्रकरणामध्ये कुठलेही कागदपत्र माझ्याकडे आलेले नाही,कागदपत्र प्राप्त होताच ताबडतोब चौकशी करून अहवाल देण्यात येईल.

श्री. अ.रशिद मामु : कागदपत्र न मिळाल्यामुळे चौकशी केली नाही असे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे प्रशासनाने खुलासा करावा. मागील बैठकीत स.सदस्य श्री.जोशी यांनी आणि मी प्रश्न उपस्थित केला होता, संबधीत अधिकारी बैठकीस हजर नाही.

उपआयुक्त (प्र) : कालच कामगार अधिकारी यांनी वैद्यकीय रजेचा अर्ज दिला आहे अर्जामध्ये डॉ.रोपळेकर यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र जोडलले आहे आणि १५ दिवस बेडरेस्ट द्यावी अस डॉक्टरांचे प्रमाणपत्र जोडून ते वैद्यकीय रजेवर आहेत तरी आवश्यक ते कागदपत्र दोन दिवसांच्या आत विभागप्रमुख म्हणुन उपलब्ध करून देण्यात येईल.

श्री.अ.रशिद मामु : आमची अशी विनंती आहे की, संबधीत अधिकारी आजारी असल्याकारणाने त्यांना मेडीकल बोर्डाकडे पाठविण्यात यावे. आज बैठक असल्याने त्यांना उत्तर द्यावे लागेल कागदपत्र द्यावे लागतील एवढे गंभीर आरोप त्यांच्यावर असतांना पत्र पाठवून कळविण्यात येते की आजारी आहे, म्हणुन त्यांना मेडीकल बोर्डाकडे पाठविण्यात यावे व कागदपत्र लवकरात लवकर देण्यात यावे.

मा.सभापती : या प्रकरणी उपआयुक्त (प्र) यांना सुचीत करण्यात येते की, चौकशी संदर्भात जे जे कागदपत्र लागतात ते तात्काळ मुख्य लेखापरिक्षक यांना उपलब्ध करून देण्यात यावे आणि श्री.लोखंडे, कामगार अधिकारी यांनी वैद्यकीय रजा टाकलेली आहे त्यांना ताबडतोब पत्र देण्यात यावे व त्यांना मेडीकल बोर्डाकडे पाठविण्यात यावे.

श्री.संजय जोशी : मागील बैठकीत घंटागाडी बाबत विषय झाला होता, सर्व घंटागाडया खराब झ ालेल्या आहे त्याबाबतीत एक टेंडर काढण्यात आले होते. टेंडर ओपन झाले परंतु वॉर्ड ऑफिसर यांना या बाबत विचारले असता निधीतून गाडया उपलब्ध करून द्या असे त्यांचे म्हणणे आहे.

मा.सभापती : प्रशासनाने खुलासा करावा.

अति.शहर अभियंता : टेंडर काढण्यात आलेले नाही, परंतु जशी जशी वॉर्ड अधिकाऱ्यांना आवश्यकता भासली तशी त्यांची मागणी घेवून गाडया पुरविण्यात आल्या आहेत.

श्री.संजय जोशी : आरोग्य विभागाकडून त्या बाबतीतचे टेंडर झालेले आहे. ज्यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांचा चार्ज डॉ.जयश्री कुलकर्णी यांच्याकडे होता त्यावेळी टेंडर निघालेले आहे.

श्री.सतिष कटकटे : संत गाडगेबाबा स्वच्छता अभियाना अंतर्गतचे ५ लाखाचे बक्षीस भेटले होते माझ्या माहितीनुसार सव्वा लाखाच्या घंटागाडया खरेदी केल्या होत्या.

शहर अभियंता : २लाख ५८ हजाराच्या घंटागाडया खरेदीचा प्रस्ताव ठेवला आहे घंटागाडया खरेदी केलेल्या नाहीत.

श्री.संजय जोशी : टेंडर झालेले असेल तर घंटागाडया खरेदी करण्यात याव्या.

श्री.सतिष कटकटे : याबाबतीत प्रकल्प अधिकारी श्री.जावरे यांना माहिती आहे.

प्रकल्प अधिकारी : ५ लाखाच्या बक्षीसाची रक्कम वॉर्ड ड कार्यालयाला मिळाली होती ती संचिका प्रभाग ड ला पाठविण्यात आली होती प्रभाग अधिकाऱ्यांनी संचिका आमची नाही म्हणून परत पाठविली आहे.

मा.सभापती : प्रक्रिया पुर्ण झालेली असेल आणि टेंडर निघालेले असेल तर घंटागाडया त्वरीत खरेदी करण्यात याव्या.

श्री.सतिष कटकटे : टेंडर झालेले आहे उर्वरीत रक्कमेपैकी कुठले कामे करायची याबाबत प्रभाग ड ला प्रस्ताव पाठविला होता स्थायी समितीत तो मंजूर करण्यात आला घंटागाडया खरेदी करण्यात आल्या त्यातुन सव्वालाख रूपये रक्कम कपात झाली.

मा.सभापती : टेंडर निघालेले असेल आणि कारवाई पुर्ण झाली असेलतर घंटागाडया तात्काळ खरेदी करून घंटागाडया उपलब्ध करून देण्यात याव्यात.

श्री.अ.रशिद मामु : जलवाहिनी संदर्भात मुंबई येथे गेले होते त्याबाबतीत काय झाले. आपले व पालकमंत्री यांचे अभिनंदन करण्यात येते. माहिती देण्यात यावी.

मा.सभापती : दिनांक २४ तारखेला औरंगाबाद येथे मा.अजितदादा पवार यांनी बैठक आयोजित केली होती, मा.आमदार श्री.राजेंद्रजी दर्डा, मा.आमदार सतिष चव्हाण, मा.महापौर, मा.उपमहापौर पदाधिकारी सभागृह नेता उपस्थित होते. मुंबई येथील बैठकीस मा.खाजदार श्री.चंद्रकांत खैरे,आमदार श्री.राजेंद्र दर्डा, श्री.तनवाणी, श्री.सतिष चव्हाण,आमदार श्री.विक्रम काळे,महापौर, उपमहापौर,सभागृहनेता, विरोधी पक्षनेता आणि महानगरपालिकेचे प्र.आयुक्त व अधिकारी बैठकीस उपस्थित होते. त्यावर सविस्तर चर्चा होउन अंतिम निर्णय झालेला आहे. ६५ कोटी रूपये महानगरपालिकेने द्यावयाचे ६५ कोटी रूपये राज्य शासनाने द्यायचे उरलेले ८० कोटी रूपये केंद्र शासनाने द्यायचे. त्यासंदर्भात कालच राज्य शासनाने पत्र तयार केले आहे. मा.श्री.राजेंद्र दर्डा यांनी महत्वचा मुद्दा उपस्थित केला की, १०० कोटी रूपये मराठवाडा पॅकेजमध्ये दिलेले आहे. त्यात दोन्ही सचिव श्री.मनु श्रीवास्तव व श्री.जैन यांचे म्हणने होते की, ३० कोटी मनपाने खर्च करावे व ७० कोटी रूपये राज्य शासनाने खर्च करावे यास आमदार श्री.राजेंद्र दर्डा यांनी आणि सर्वानी विरोध केला मा.श्री.अजितदादांनी मा.श्री.राजेंद्र दर्डा यांची मागणी लगेच मान्य केली दोन्ही सचिवांना सांगण्यात आले की, २७ तारखेच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत टिप्पणी ठेवण्यांत यावी. १०० कोटी रूपये तात्काळ महानगरपालिकेला देण्यात यावी. सर्वांची जी मागणी होती ती मा.श्री.अजितदादा यांनी तात्काळ मान्यता दिली.

श्री.अ.रशिद मामु : याबाबतीत मा.श्री.अजितदादा आणि आमदार श्री.राजेंद्र दर्डा यांचे अभिनंदन करण्यात येते तसेच स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती यांनी पुढाकार घेतला याबद्दल आपलेही अभिनंदन करण्यात येते. तसेच मा.खासदार श्री.चंद्रकांत खैरे,महापौर,उपमहापौर,विरोधी पक्षनेता व सर्व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करण्यात येते. मा.श्री.अजितदादा यांनी याविषयात राजकारण आणू नये म्हणून सांगण्यात आले आहे.

श्री.रविकांत गवळी : स.स.श्री.रशिद मामु यांनी जो अभिनंदनाचा ठराव ठेवला तो वाखण्याजोगा आहे.स्थानिक आमदार श्री.तनवाणी, या सर्वांनी प्रश्न उपस्थित केलेला आहे.सदरील प्रश्न जनतेचा जिव्हाळयाचा प्रश्न आहे यात राजकारण आणता कामा नये, शिवसेनेचे उपनेते श्री.चंद्रकांतजी खैरे हे गेल्या दोन वर्षांपासून केंद्र सरकारकडे सदरील मुद्दा उपस्थित केलेला आहे. केंद्र शासनाकडून मंजूरी घेवून ४०० कोटी रूपये मनपाला सहा महिण्यांपूर्वी मंजूरी घेतली आहे. टेक्निकल अडचणीमुळे तो प्रलंबित राहिला. त्याबाबतीत केंद्र शासनाने परिपत्रक काढले २८८ कोटींचा चेक देण्यात आला.

मा.सभापती : समांतर जलवाहिनीसाठी २८८ कोटींचा चेक औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त झाला काय? प्रशासनाने खुलासा करावा. समांतर जलवाहिनीबाबत कुठलेही राजकारण करायचे नाही.

श्री.रविकांत गवळी : शासनाकडुन जो निधी मंजूर झालेला आहे तो तातडीने आणण्यासाठी सगळयांनी प्रयत्न केले पाहिजे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : गेल्या २० ते २५ वर्षापासूनचा पाण्याचा प्रश्न आहे तो मार्गी निघालेला आहे. महानगरपालिकेचे अधिकारी आणि मा.मुख्यमंत्री, पालकमंत्री, आणि स्थानिक सर्व पक्षाचे मंत्री, मा.खाजदार यांनी विशेष लक्ष घातले आहे या सर्वांचे अभिनंदन करण्यात येते.

मा.सभापती : दि.२२ तारखेला मा.अजितदादा पवार यांनी समांतर जलवाहिनी संदर्भात बैठक घेण्यात आली होती आणि दि.२५ तारखेला मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती त्या बैठकीत सचिव मा.श्री.ए.के.जैन आणि सचिव मा.श्री.मनु श्रीवास्तव यांनी बैठकीत बोलवण्यात आले होते. बैठकीत श्री.राजेंद्र दर्डा यांनी मनपाचे ३० कोटी बाबत शासनाकडे पाठपुरावा केला आणि शासनाचे लक्ष वेधले यास सर्व पदाधिकाऱ्यांनी

पाठिंबा दिला. मा.अजित दादांनी मा.मुख्यमंत्र्यांशी याबाबत चर्चा केली. आणि ३० कोटी रूपये मा.आ.राजेंद्र दर्डा यांच्यामुळे वाचले आहे. मा.श्री.अजितदादा यांच्या सांगण्यानुसार या प्रकरणी कुठलेही राजकारण करायचे नाही. महानगरपालिकेस लवकरात लवकर समांतर जलवाहिनीतून पाणीपुरवठा व्हावा यासाठी राज्याचे मुख्यमंत्री श्री.अशोकरावजी चव्हाण, मा.अजितदादा या शहराचे खासदार श्री.चंद्रकांत खैरे, आमदार श्री.राजेंद्र दर्डा, आमदार श्री.किशनचंद तनवाणी, आमदार श्री.सतिष चव्हाण, आमदार श्री.विक्रम काळे, औरंगाबाद शहराचे महापौर, उपमहापौर, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, गटनेता श्री.कराड, श्री.मनमोहनसिंग ओबेराय आणि सर्व पदाधिकारी उपस्थित होते. याप्रकरणी अधिकाऱ्यांनी मा.अजितदादा यांचेकडे बाजू मांडली यासर्वांचे स.स.सुचविल्याप्रमाणे अभिनंदन करण्यात येते.

श्री.अ.रशिद मामु : शहरात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. मा.महापौरांच्या वार्डात पाण्याच्या प्रश्नाबाबत नागरीक/महिला पाण्याच्या टाकीवर जावून आपला रोष व्यक्त करीत होते. खुलासा करण्यात यावा.

श्री.संजय जोशी : पाण्याच्या टाकीची लेवल कमी येत आहे.

श्री.मोहन मेघावाले : माझ्या वॉर्डात कमी प्रेशरने पाणी पुरवठा होतो.

मा.सभापती : कार्यकारी अभियंता श्री.डी.पी.कुलकर्णी हे मुंबई येथील बैठकीहुन आलेले नाही. पाण्याच्या प्रश्नाबाबत शहर अभियंता,तिन्ही कार्यकारी अभियंता, आणि प्र.आयुक्त यांना बोलावून बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.अ.रशिद मामु : वॉटर सप्लाय व्यवस्थित करण्याकरीता एकाच अधिकाऱ्यांकडे हा विभाग वर्ग करण्यात यावा.

मा.सभापती : स्थायी समितीच्या सर्व सदस्यांच्या बोलावून बैठक आयोजित करण्यात येईल.

श्री.संजय जोशी : सिटी सर्व्हे नं. १४८१६ डार्लिंग हॉटेलकडून जो रस्ता उत्सव मंगल कार्यालयाच्या बाजूला निघतो तो डिपी रोड रिझर्व आहे मनपाचे कर्मचारी मार्कींग करण्याकरीता गेले असता नागरीकांनी मार्कींग करू दिली नाही पण मनपाने बांधकाम परवानगी दिली आहे. रिर्झवेशनच्या बॉड्रीवर प्लॉट आहे. त्या प्लॉटमधुन रस्त्याची जागा हॅन्ड ओव्हर करावी हया अटीवर परवानगी दिलेली आहे परंतु आजच्या स्थितीत रस्त्याची जागा हॅन्ड ओव्हर न होता बांधकाम होत आहे. पर्यायाने भविष्यात सदरचा रस्ता रिर्झवेशनमध्ये शिप्ट करावा लागेल. पुढची समस्या निर्माण होण्यापुर्वीच सदरील बांधकाम थांबविण्यात यावे व रस्त्याची जागा ताब्यात घ्यावी.

मा.सभापती : प्रशासनाने याबाबत माहिती देण्यात यावी.

शहर अभियंता : सदरच्या ठिकाणी बांधकामाची तयारी सुरू आहे तेथील काही नागरीकांचा बांधकामास विरोध आहे.

श्री.संजय जोशी : सिटी प्राईडला याच प्रकारे परवानगी दिली होती त्यामुळे भविष्यात समस्या निर्माण होण्यापुर्वीच कारवाई करण्यात यावी.

शहर अभियंता : सुरवातीला रस्ता निर्माण करण्यात येवून मगच बांधकामास परवानगी देण्यात येईल.

मा.सभापती : शहर अभियंता यांनी स्वतः जावून जागेची पहाणी करावी व मार्कींग करून घेण्यात यावी भविष्यात प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेवून त्यावर कारवाई करण्यात यावी.

श्रीमती सफिया मोमिन : मला प्राप्त झालेल्या पत्राबाबत खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : सदरचे पत्र प्रशासनाने वाचून दाखववे.

सचिव : जा.क्रं/मनपा/नर/२७१६ दिनांक १७.११.१९८६ चे बांधकाम परवानगी देणेबाबतचे पत्र वाचून दाखविण्यात आले. पत्राचा मजकूर पुढील प्रमाणे.

चअसे निर्देशनास आले आहे की, औरंगाबाद मनपा हद्दीत असलेल्या क्षेत्राच्या सरपंच ग्रामपंचायत मौजे सातारा हे महानगरपालिकेच्या कक्षेतील क्षेत्रातसुध्दा भुखंडधारकांना

बांधकाम परवानगी देतात हि बाब कायदयाला अनुसरून नाही. म्हणून सुचित करण्यात येते की, आपण महानगरपालिकेच्या क्षेत्रात यापुढे एकही परवानगी देवू नये याची कृपया नोंद घ्यावी.

मा.सभापती : स.सदस्य श्रीमती सफिया मोमिन यांनी दिलेल्या पत्राची प्रशासनाने तात्काळ दखल घेवून पुढील बैठकीत याबाबतचा खुलासा करण्यात यावा.

श्रीमती सफिया मोमिन : अग्निशमन विभागातर्फे किती एजन्सींना नोटीस देण्यात आली आहे?

मा.सभापती : याबाबत अग्निशमन अधिकारी यांनी पुढील बैठकीत खुलासा देण्यात यावा.

श्री.सतिष कटकटे : प्रभाग ड चे साफसफाईचे खाजगीकरण करण्यात आले होते ते रद्द करून महानगरपालिकेचे २५० ते ३०० कर्मचारी होते ते तत्कालिन आयुक्त श्री.बंड साहेब यांनी सर्व VIP कर्मचारी काढून प्रभाग ड ला देण्यात आले मा.आयुक्तांची बदली झाल्यानंतर सफाई मजूर पुन्हा पुर्वीच्या जागी गेलेले आहे.

मा.सभापती : प्रशासनाने याबाबत काही आदेश काढले आहे काय?
सहाय्यक आयुक्त-२ श्री.जरारे रजेवर आहेत. प्रशासनाने याबाबत तात्काळ कारवाई करावी.

**विषय क्र. २३२ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००९-२०१० साठी आठवडी बाजार (शुक्रवार आणि रविवार) आणि वाहनतळ (डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, संत एकनाथ रंगमंदिर व पैठणगेट) शुल्क वसुलीसाठी जाहीर लिलाव/निविदा पध्दतीने देणे बाबत कार्यालयीन पत्र जा.क्र.मनपा/मामअ/२३१/२००९, दि.९/२/२००९ अन्वये स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी देऊन दि.१८-२-२००९ रोजी बाजाराचा सकाळी ११.०० वाजता आणि वाहनतळाचा दुपारी ३.०० वाजता जाहीर लिलाव करण्यात आला.

०१. **जाफरगेट (रविवार) आठवडी बाजारासाठी** फक्त एकच बोलीधारक नामे श्री.दिपचंद मोहन रेसवाल, यांनी भाग घेवून आधारभुत किंमतीपेक्षा (आधारभूत किंमत रू.१९,२२२/- प्रती बाजार) रू.१००/- प्रती बाजार (म्हणजे रू.१९,३२२/-) सन २००९-२०१० साठी बाजार वसूली शुल्काचा ठेका घेण्यास लेखी कळविले आहे.

०२. **डॉ.सलीम अली सरोवर उद्यान वाहनतळ** व प्रवेश शुल्क वसूलीच्या लिलावात भाग घेण्यासाठी एकुण ०४ व्यक्तींनी हजर राहुन ०४ पैकी फक्त तीन व्यक्तींनी लिलावात बोली बोलली.

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. मो. मसी मो. खाजा | रू.११,०००/- (**अंतिम बोली**) |
| ०२. | श्री.उस्मान शाह हाजी सांडू शाह | रू.१०,७८६/- (अंतिम बोली) |
| ०३. | श्री. गणेश कारभारी आघाव | रू.१०,२००/- (अंतिम बोली) |

याप्रमाणे सर्वोच्च बोली श्री.मो. मसी मो. खाजा यांची रक्कम रू.११,०००/- प्रती माह आहे.

०३. **संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ** शुल्क वसुलीच्या लिलावात भाग घेण्यासाठी एकुण ०३ व्यक्तींनी भाग घेतला. पैकी ०२ व्यक्तींनी लिलावात बोली बोलली.

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री. विकास काशीकर | रू.७,१००/- (**अंतिम बोली**) |
| ०२. | श्री.संजु ताराचंद सलामपुरे | रू.७,०००/- (अंतिम बोली) |

या प्रमाणे सर्वोच्च बोली श्री.विकास काशीकर यांची रक्कम रू.७,१००/- प्रत माह आहे.

०४. **पैठणगेट वाहतळ** शुल्क वसुलीच्या लिलावात भाग घेण्यासाठी एकुण ०२ व्यक्तींनी भाग घेतला.

| | | |
|---|---|---|
| ०१. | श्री.सय्यद मुर्तझा सय्यद अफसर | रू.८,०००/- (**अंतिम बोली**) |
| ०२. | श्री.दिपचंद मोहन रेसवाल | रू.७,५५१/- (अंतिम बोली) |

याप्रमाणे सर्वोच्च बोली श्री.सय्यद मुर्तझा सय्यद अफसर यांची रक्कम रू.८,०००/- प्रती माह आहे.

करीता वरील प्रमाणे संबंधीतांची उच्चतम बोली विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

श्री.रविकांत गवळी : जाफरगेट येथील आठवडी बाजार याबाबत मागील दोन ते तिन बैठकीत जाफरगेट आठवडी बाजाराच्या मालकीहक्काचा पुरावा संदर्भात स.स.श्री.सतिष कटकटे यांनी वारंवार मागणी केलेली आहे तसेच आपणही आदेशीत केलेले आहे मालकी हक्काबाबतचे पुरावे बाबत प्रशासनाने कुठली कारवाई केलेली आहे परंतु अद्याप पर्यंत

माहिती अप्राप्त आहे. प्रशासनाने खुलासा करतांना चुकीची माहिती देण्यात आली आहे. जाफरगेटची जी जागा आहे सिटी सर्व्हे नं.१३३६७ आणि १२९५८ असे दाखविण्यांत आले आहे. सदरचे सिटी सर्व्हे नं. हे जाफरगेट आठवडी बाजाराचे आहे काय? तसेच पुढे खुलासा केला आहे की, जाफरगेट आठवडी बाजाराची जागा महानगरपालिकेची नाही तथापी जागा ताब्यात आहे. त्या आठवडी बाजाराचे टेंडर काढू शकतो काय तसेच सिटी सर्व्हे नं. बाबत खुलासा करण्यात यावा.

उपआयुक्त (सिडको) : मालमत्ता अधिकारी यांनी जी माहिती सादर केली आहे ते योग्य आणि सत्य समजुन बैठकीत ठेवली आहे.

मा.सभापती : मालमत्ता अधिकारी यांनी खुलासा करावा.

मालमत्ता अधिकारी : जाफरगेटबाबतची जी संचिका मालमत्ता विभागात आहे त्यामध्ये जे पिआर कार्ड नविन झालेले आहे त्याची माहिती संकलित केलेली आहे त्यानुसार माहिती समोर ठेवलेली आहे. वेळेअभावी माहिती संकलित केली नाही.

मा.सभापती : मागील ५० वर्षांपासून जाफरगेटची जागा महानगरपालिकेची आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जाफरगेट येथील कडबा बाजार महानगरपालिकेने आरक्षीत केलेला आहे.

श्री.रविकांत गवळी : खुलासा करण्यात यावा की, पिआर कार्डवर १३३६७ आणि १२९५८ हे पिआर कार्ड कुढले आहेत. मागील बैठकीत त्या जागेचे पिआर कार्ड सादर केलेले आहे. सदरील जागेच्या मालकी हक्काबाबत ओनरचे नाव लिहिलेले आहे श्रीमती चंदाबाई रूपचंद, आनंदी मोतिलाल,सुरजभाई समिरमल, सुलाभाई समिरमल,मेहबूबभाई कादर यांना मालक केलेले आहे. मालकी हक्क नसतांना ठेका देउ शकतो का? सदरील व्यक्तींनी महानगरपालिकेविरूध्द तक्रार केल्यास महानगरपालिका काय करणार.

मा.सभापती : दोन्ही संबधीत अधिकारी यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात यावी, उपआयुक्त(प्र) यांनी चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात यावी.

श्री.अ.रशिद मामु : अभ्यास न करता पत्र इश्यु कसे केले जाते.

मा.सभापती : प्रशासनाने एवढया घाईत पत्र देण्याची काय गरज होती, याबाबतीत कायदेशीर सल्ला घेणे जरूरी होते.

श्री.अ.रशिद मामु : उद्या कार्टात सदरील पत्र दाखविण्यात येईल की सदरील जमीन आमच्या नावावर आहे.

श्री.दत्ताभाउ पाथ्रीकर : जे पत्र देण्यात आलेले आहे ते ताबडतोब रद्द करण्यात यावे व यापुढे चुकीची माहिती देण्यात येवू नये. आरक्षण क्रमांक ५४चा ठराव झालेला आहे ती जमीण कडबा बाजाराकरीता आहे.

श्री.संजय जोशी : जागा हि आपल्या मालकीची आहे एका सक्षम अधिकाऱ्यांची नियुक्ती करून जमीन आपल्या नावे लावण्यात यावे, मागील बैठकीत ज्या समितीस मुदतवाढ दिली होती. त्यांना नियुक्त करून पि.आर. कार्डवर आपले नांव प्राध्यान्याने लावण्यात यावे.

मा.सभापती : मागील बैठकीत आदेश दिले होते की, सिटी सर्व्हे ऑफिस मध्ये जावून आक्षेप दाखल करावे ते आक्षेप सादर केले काय?

मालमत्ता अधिकारी : नगर रचना विभागास या संदर्भात सहकार्य करावे म्हणून वारंवार पत्र पाठविण्यात आले आहे. दिनांक २१.२.२००९ रोजी पत्र दिलेले आहे.

मा.सभापती : मागील बैठकीत आदेश केलेले होते त्याचे पालन केले आहे काय?

श्री.रविकांत गवळी : मागील बैठकीत पिआर कार्डवर चुकीची नोंद झालेली आहे सिटी सर्व्हे ऑफिसमध्ये महानगरपालिकेतर्फे आक्षेप नोंदविण्यासाठी कळविण्यांत आले होते आणि आक्षेप नोंदविण्याची प्रत स्थायी समितीस सादर करावी.

श्री.संजय जोशी : जमीन आपल्या नावे नाही अस लेखी लिहुन देण्यात आले काय?

मालमत्ता अधिकारी : सदरील जागेवर आजही ताबा महानगरपालिकेचा आहे.

मा.सभापती : कोटयावधी जमीनीबाबत कायदेशिर सल्ला घेण्यात आला नाही.

श्री.अ.रशिद मामु : रेकॉर्डची तपासणी केली आहे काय? मग त्यांना पत्र कसे देण्यात आले.

श्री.सतिष कटकटे : आज सदरजागेवर मालमत्ता अधिकारी Vistit ला गेले होते.

मालमत्ता अधिकारी : जाफरगेट येथील जागा निष्कासित करण्याकरीता तयारी केली होती, पोलिस फोर्स न मिळाल्यामुळे मोहिम पुढे ढकलण्यात आली आहे.

मा.सभापती : प्रशासनाने आज स्थायी समितीत दिलेले पत्र जा.क्र./मनपा/मालमत्ता अधिकारी/३३७२०९ दिनांक २६.०२.२००९ चे पत्र तात्काळ रद्द करण्यात यावा असा आदेश स्थायी समिती देत आहे. ज्या लोकांना लेखी पत्र मालमत्ता विभागाकडून गेले असेल तर तेही पत्र तात्काळ रद्द करण्याची कारवाई करण्यात यावी. या प्रकरणी स.स.श्री.सतिष कटकटे,श्री.रविकांत गवळी,श्री.संजय जोशी वारंवार सभागृहास मुद्दा मांडूनही योग्य उत्तर मिळालेले नाही. तरी याप्रकरणी पत्र देणारे उपआयुक्त(सिडको) आणि पत्र निर्गमित करणारे मालमत्ता अधिकारी यांना तात्काळ कारणे दाखवा नोटीस देवून त्याबाबतची पुढील कारवाई उपआयुक्त(प्रशासन) यांनी करावी. उपआयुक्त(प्रशासन) यांनी जातीने लक्ष घालून महानगरपालिकेचे नाव तात्काळ लावून किंवा लावण्यासंबधीची कार्यवाही करण्यात यावी. स्थायी समितीने मागच्या बैठकीत आदेश देवुनहीसुध्दा मालमत्ता विभागाकडून काही ही कारवाई झालेली नाही यामुळे स्थायी समिती खेद व्यक्त करते.

श्री.अ.रशिद मामु : एक निवेदन आले आहे, सराफा येथुन भडकल गेट येथील रोड ५० फुटचा रोड तुटलेला आहे नागरीक जागा देण्यास तयार आहे मग महानगरपालिका का थांबवत आहे.

मा.सभापती : मा.शहर अभियंता यांनी या संबधी योग्य ती कारवाई करावी.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००९-२०१० साठी आठवडी बाजार (शुक्रवार आणि रविवार) आणि वाहनतळ (डॉ.सलीम अली सरोवर उद्यान, संत एकनाथ रंगमंदिर व पैठणगेट) शुल्क वसुलीसाठी झालेल्या जाहीर लिलावानुसार -

०१. जाफरगेट (रविवार) आठवडी बाजारासाठी बोलीधारक श्री.दिपचंद मोहन रेसवाल प्रती बाजार म्हणजे रू.१९,३२२/- सन २००९-२०१० साठी बाजार वसूली शुल्काचा ठेका देण्यास मंजुरी देण्यात येते.

०२. डॉ.सलीम अली सरोवर उद्यान वाहनतळ व प्रवेश शुल्क वसुलीसाठी सर्वोच्च बोली बोललेले श्री.मो. मसी मो. खाजा यांची रक्कम रू.११,०००/- प्रती माह प्रमाणे ठेका देण्यास मंजुरी देण्यात येते.

०३. संत एकनाथ रंगमंदिर वाहनतळ शुल्क वसुलीसाठी सर्वोच्च बोली बोललेले श्री.विकास काशीकर यांची रक्कम रू.७,१००/- प्रती माह प्रमाणे ठेका देण्यास मंजुरी देण्यात येते.

०४. पैठणगेट वाहतळ शुल्क वसुलीसाठी सर्वोच्च बोली बोललेले श्री.सय्यद मुर्तझा सय्यद अफसर यांची रक्कम रू.८,०००/- प्रती माह प्रमाणे ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

<u>: ऐनवेळचे विषय :</u>

**<u>विषय क्र. २३३ :</u>**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, प्रभाग क्र.३९ राजाबाजार येथे संस्थान गणपती ते जाधवमंडी रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामाचे सा.बां. खात्याच्या सन २००७-२००८ च्या दरसूचीनुसार रक्कम रू.१२,९४,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षात शहरी भागात पुनःर्डांबरीकरण करणे या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

तरी रक्कम रू.१२,९४,६००/- चे अंदाजपत्रकाचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.३९ राजाबाजार येथे संस्थान गणपती ते जाधवमंडी रस्त्याचे पुन:र्डांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१२,९४,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२ मधील मयुरपार्क भागातील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाच्या रक्कम रू.१३,९२,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीच्या दि.४/२/०९ रोजीच्या बैठकीत विषय क्र.१९४ अन्वये मान्यता मिळाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या आहेत. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा ७.३% जास्त दराची आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा असून त्यास वाटाघाटी करून अं.प. दरापेक्षा ५.३१% जास्त दराने मा.आयुक्त यांची दि.२४/२/०९ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा ५.३१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मधील मयुरपार्क भागातील खडी रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेमार्फत अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.३१% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब आणि क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२ मधील स.नं.१५६ सिध्देश्वर कॉलनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाच्या रक्कम रू.१९,७२,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीच्या दि.४/२/०९ रोजीच्या बैठकीत विषय क्र.१९३ अन्वये मान्यता मिळाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा ५.३१% जास्त दराची श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा असून त्यास मा.आयुक्त यांची दि.२४/२/०९ नुसार मान्यता प्राप्त झाली आहे.

त्यानुसार सदर कामाची सर्वात कमी दराची निविदा ५.३१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची श्री.राजेंद्र अजितसिंग यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ मधील स.नं.१५६ सिध्देश्वर कॉलनी येथे रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.३१% जास्त दराची श्री.राजेंद्रसिंग अजितसिंग यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३६ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) हे प्रस्ताव सादर करत आहेत की, वॉर्ड क्र.१७, एन-९ सिडको, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौ.सोसा., अल्का हौ.सोसा. व चंद्रनगर हौ.सोसा. येथील भागातून वाहणाऱ्या नाल्यास संरक्षित भिंत बांधून नाला चॅनलिंग करणे या कामाचे अंदाजपत्रक सा.बां./म.जी.प्रा. दरसूची सन २००७-०८ नुसार अंदाजपत्रक रक्कम रू.२४,७९,०००/- तयार करण्यात आले होते.

मा.सर्वसाधारण सभा दि.३१.१.२००८ ठराव क्र.१२४ अन्वये वळती केलेली रक्कम रू.१४.८० लक्ष आणि विशेष शासकीय अनुदानातून र.रू.१०.०० लक्ष अशी एकूण र.रू.२४.८० लक्ष या कामासाठी तरतुद उपलब्ध करण्यात आली आहे. तसेच मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.१४१ दि.१६.२.२००८ अन्वये र.रू.२४,७९,०००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झाली आहे.

उपरोक्त मंजुरीनुसार सदर कामाच्या निविदा "ई" टेंडरींग विभागामार्फत मागविण्यात आल्या, एकूण प्राप्त सहा निविदापैकी सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराची निविदा कंत्राटदार श्री.सय्यद समीउद्दीन रजवी यांची होती. त्यास मा.स्थायी समिती सभा दि.२२/९/२००८ विषय क्र.९४ अन्वये

मंजुरी झाली होती. त्यांच्या विविध कामांची देयके इतर विभागात थकीत असल्याने व त्यांना ही निविदा दाखल करून १२० दिवसांपेक्षा जास्त कालावधी झाल्याने सदर काम करणेस त्यांनी असमर्थता दर्शविली. त्यामुळे प्राप्त निविदा यादीतील क्रमांक २ व ३ च्या कंत्राटदारांना आणि इतरांना विचारणा केली असता त्यांनी प्रथम क्रमांकाचे कंत्राटदार यांचे निविदा भरलेल्या दराने म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराने आणि निविदा स्पर्धेत त्यांनी ऑफर केलेल्या दराने काम करण्यास नकार दिला आहे.

चालू दरसूची सन २००८-०९ प्रमाणे वरील मूळ कामास र.रू.२४.८० पेक्षा जास्त खर्च लागणार असल्यामुळे आणि र.रू.२४,८० पेक्षा जास्त तरतूद या कामासाठी सध्या उपलब्ध नसल्यामुळे मा.सर्वसाधारण सभेने मंजुरी प्रदान केलेल्या रक्कमेच्या हद्दीपर्यंतच काम करण्याचे ठरल्यामुळे आणि संबंधीत वॉर्डाचे स.नगरसेवक श्री.महेश माळवतकर यांनी देखील तशी समक्ष विनंती केल्यानुसार पुर्वीच्या मूळ अंदाजपत्रकातील काही कामाचा भाग वगळून चालू दरसूची सन २००८-०९ नुसार उर्वरीत भागाचे सुधारीत अंदाजपत्रक र.रू.२४,७३,०००/- चे तयार करण्यात आले आणि त्यास मा.सर्वसाधारण सभा दि.१२/२/२००९ विषय क्रमांक ४०२ अन्वये मान्यता प्राप्त झाली आहे.

सदर कामाच्या पुनः निविदा बोलविण्यात आल्या असता प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. मे. तुषार कन्स्ट्रक्शन ८% कमी दराने
२. श्री.शेख सलीम मोहीयोद्दीन ७.८% कमी दराने

मे.तुषार कन्स्ट्रक्शन यांच्या ८% कमी दराच्या निविदेस प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. मे.तुषार कन्स्ट्रक्शन यांची तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच ८% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.१७, एन-९ सिडको, डॉ.बाबासाहेब आंबेडकर हौ.सोसा., अल्का हौ.सोसा. व चंद्रनगर हौ.सोसा. येथील भागातून वाहणाऱ्या नाल्यास संरक्षित भिंत बांधून नाला चॅनलिंग करणे या कामासाठी सुधारीत अंदाजपत्रकाप्रमाणे प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% कमी दराची मे. तुषार कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३७ :**

कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत देखभाल दुरूस्ती करीता विविध व्यासाच्या स्लुस व्हॉल्वचा पुरवठा करणे या कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या दरसुचीनुसार रू.९,७३,०००/- चे तयार करण्यात आले होते.

मंजुरीनुसार व्हॉल्वच्या पुवठ्याबाबत निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली. निविदा स्विकृतीच्या शेवटच्या दिनांकास विक्री झालेल्या एकुण ३ निविदापैकी दर भरलेली ३ निविदापत्रके प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे

| अ.क्र. | गुत्तेदाराचे नांव | दर | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | अमित इंजिनिअर्स | ५७.७% जास्त दराने | रू.१५,३४,४२१ |
| २. | तिरूपती इलेक्ट्रीकल्स ॲन्ड सेल्स | ८७% जास्त दराने | रू.१८,१९,५१० |
| ३. | न्यु साधना इंजिनिअरींग वर्क्स | ८९% जास्त दराने | रू.१८,३८,९७० |

उपरोक्त प्रमाणे सर्वात कमी दराची निविदा ही अमित इंजिनिअर्स यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५७.७% जास्त इतक्या रक्कमेची आहे. नवीन दरसुचीशी तुलना केल्यास निविदेमध्ये भरलेले दर हे ३.५३% कमी येतात. करीता सदर निविदा तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची असल्यामुळे मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ व मान्यतेस्तव सादर करण्यासाठी मा.आयुक्त यांनी शिफारस केली आहे. तरी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत देखभाल दुरूस्ती करीता विविध व्यासाच्या स्लुस व्हॉल्वचा पुरवठा करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५७.७% जास्त दराची अमित इंजिनिअर्स यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८ :**

औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयकाचे एक पद दरमहा मानधन रू.५,०००/- व ११ महिन्याच्या करार पध्दतीने भरण्यासाठी थेट मुलाखतीसाठी जाहीरात देण्यात आली होती.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने दि.४/१२/२००७ रोजी एकूण २० उमेदवारांच्या तोंडी मुलाखत घेतली. गुणवत्तेनुसार पहिल्या क्रमांकावर असलेले श्री.सावरे कोंडीराम शेषराव यांची 'मानद समन्वयक' पदी दि.२८/२/२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्र.३९१ नुसार नियुक्ती करण्यात आली होती. परंतु श्री.सावरे यांनी दि.२१/४/२००८ रोजी राजीनामा दिलेला आहे. त्यामुळे रिक्त झालेल्या पदी गुणानुक्रमे दुसऱ्या क्रमांकावर असलेले श्री.विनायक देवराव येवते, यांची 'मानद समन्वयक' पदी दि.२१/१०/२००८ रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीमध्ये ठराव क्र.९२ नुसार नियुक्ती करण्यात आली होती. परंतु ते अद्यापपावेतो रूजू झालेले नाही.

करिता सदरील रिक्त असलेल्या पदी गुणानुक्रमे तिसऱ्या क्रमांकावर असलेले महिला उमेदवार कु.वैशाली विदूर गवई यांची 'मानद समन्वयक' म्हणून दरमहा मानधन रू.५,०००/- व ११ महिन्यासाठी नियुक्तीस मान्यता देण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिका संचलित भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र, औरंगाबाद येथे मानद समन्वयक पद करार पध्दतीने भरण्यासाठी, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम-१९४९ चे कलम ५४(१) अन्वये गठीत केलेल्या निवड समितीने घेतलेल्या मुलाखतीअंती गुणवत्तेनुसार तिसऱ्या क्रमांकावर असलेले महिला उमेदवार कु.वैशाली विदूर गवई यांची 'मानद समन्वयक' म्हणून दरमहा मानधन रू.५,०००/- व ११ महिन्यासाठी नियुक्ती करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

ऐनवेळचे विषय

मा.सभापती : ऐनवेळचे सर्व प्रस्तावांना मजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २३९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सिडको एन-७ येथील जुने शॉपींग सेंटर समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३६,०७,७३५/- च्या अंदाजपत्रकाच्या कामासाठी निविदा पत्रके मागविली असता, एकुण २ निविदा पत्रके विक्री झाली. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत १ निविदापत्रक प्राप्त झाले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. सुरूची आर्टस्   ८.३३% जास्त दराने

वरील नमूद निविदेत सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. सुरूची आर्टस् यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.३३% जास्त दराचे होते. सदरील निविदेस प्रत्यक्ष वाटाघाटी अंती मा.आयुक्त यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने काम करण्यास मंजुरी देऊन प्रस्तावास मा.स्थायी समितीची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

तरी मे.सुरूची आर्टस् यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने करून घेणे बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको एन-७ येथील जुने शॉपींग सेंटर समोर छत्रपती शिवाजी महाराज यांचा अश्वारूढ पुर्णाकृती पुतळा उभारण्यासाठी निविदाधारक मे. सुरूची आर्टस् यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार मे.सुरूची आर्टस् यांचेकडून सदरील काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.००% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.०७ भिमनगर भावसिंगपुरा येथे विविध ठिकाणर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१५,१४,८३० /- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता मिळाल्यानुसार

सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

१. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश १८.००% कमी दराने

२. अब्दुल कदीर शेख रहीम १२.१२% कमी दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा १८.००% कमी दराची टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा असून मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदर कामाची सर्वात कमी दराची व अं.प. दरापेक्षा १८.००% कमी दराची टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.०७ भिमनगर भावसिंगपुरा येथे विविध ठिकाणर पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प. दरापेक्षा १८.००% कमी दराची टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दि.२६.०२.२००९ रोजी सहाय्यक संचालक नगर रचना तथा शहर अभियंता यांचेशी झालेल्या चर्चेप्रमाणे नगर रचना विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व मालमत्तेची अभिलेख शासनाच्या पध्दतीनुसार तयार करण्यासाठी एका शासकीय निवृत्त तालुका निरीक्षक भूमी अभिलेख/तहसिलदार, तत्सम दर्जाचा अधिकारी वर्क चार्ज वर नेमणुक करण्यासाठी मंजुरी देणेसाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर. मंजुरीनंतर स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवून शासकीय सेवा निवृत्त अधिकाऱ्यांना फिक्स पे वर सहा महिन्याच्या कालावधीसाठी काम करण्यासाठी बोलविणेसाठी कार्यवाही करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे नगर रचना विभागाच्या अंतर्गत येणाऱ्या तसेच महानगरपालिका अंतर्गत येणाऱ्या सर्व मालमत्तेचे अभिलेख शासनाच्या पध्दतीनुसार तयार करण्यासाठी एका शासकीय निवृत्त तालुका निरीक्षक भूमी अभिलेख/तहसिलदार, तत्सम दर्जाचा अधिकारी वर्क चार्ज वर शासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना फिक्स-पे (ठरावीक वेतन) वर नेमणुक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४२ :**

शहर अभियंता यांचेकडून प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मो.उस्मानपुरा येथील न.भु.क्र.१६९९७ ही मिळकत उस्मानपुरा गुरूद्वारा ते पीरबाजार या १५.०० मीटर विकास योजना रस्त्याने अंशतः बाधीत होत असून या जागेत पोलीस स्टेशन उस्मानपुरा अंकीत पोलीस चौकी उस्मानपुरा होती. ती रस्त्याचे बाधीत क्षेत्रात असल्याने सदर चौकी तोडून बाधीत क्षेत्राचा महानगरपालिकेकडे ताबा देण्यास संबंधीत विभाग तयार आहे. या ऐवजी सदर पोलीस चौकी बांधून द्यावी म्हणुन संबंधीत विभागाने महानगरपालिकेकडे प्रस्ताव सादर केला आहे.

सदर जमीन शासकीय मालकीची असल्याने त्यासाठी बाधीत क्षेत्राचे मुल्य देय होत नाही. मात्र लगतच्या परिसरातील खाजगी मिळकतीचा वापर विचारात घेता ही जागा खाजगी मालकीची असती तर त्यासाठी किमान बाजार मुल्य सन २००९ चे सिध्द शिघ्र गणक दर विचारात घेता साधारणतः रूपये ८,९००/- प्रति चौ.मी. या दराने बाधीत क्षेत्र ३१.६२ चौ.मी. करीता रूपये २,८१,४००/- एवढा मोबदला रक्कम होतो. खाजगी मिळकत धारकास एवढी रक्कम महानगरपालिकेस देऊन नंतरच भूसंपादन करता आले असते.

पोलीस चौकीची त्या भागाकरीता असलेली आवश्यकता व संबंधीत विभागाची मागणी पाहता एवढ्या रक्कमेतून महानगरपालिकेकडून त्या जागी रस्त्याने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्रात पोलीस चौकी बांधून देणे योग्य वोटते. तथापी प्रस्ताव निर्णयास्तव व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे उस्मानपुरा गुरूद्वारा ते पीरबाजार या १५.०० मीटर विकास योजना रस्त्याने अंशतः बाधीत होणारी मिळकत मो.उस्मानपुरा येथील न.भु.क्र.१६९९७ मधील उस्मानपुरा अंकीत पोलीस चौकी

उस्मानपुरा रस्त्याचे बाधीत क्षेत्रात असल्याने सदर चौकी तोडून बाधीत क्षेत्राचा महानगरपालिकेकडे ताबा देण्यास संबंधीत विभाग तयार असल्याने या ऐवजी महानगरपालिकेकडून त्या जागी रस्त्याने बाधीत क्षेत्र वगळून उर्वरीत क्षेत्रात पोलीस चौकी बांधून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथे भगवान गौतम बुध्द यांची ध्यानस्थ मुद्रेतील मुर्ती बसविणेच्या कामासाठी दरपत्रके मागविली असता, एकुण ३ दरपत्रके विक्री झाली. त्यापैकी दरपपत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण ३ दरपत्रके प्राप्त झाली. त्याचा तुलनात्मक तपशील खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. मे.मडीलगेकर्स आर्टस् स्टुडिओ | ५२.८० लक्ष |
| २. सुरूची आर्टस् | ५९.२० लक्ष |
| ३. सुनिल देवरे | ८१.०० लक्ष |

वरील प्राप्त दरपत्रका पैकी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे.मडीलगेकर्स आर्टस् स्टुडिओ यांचे रक्कम रू.५२.८० लक्ष इतके आहे. सदर कामासाठी दरपत्रके मागविताना काही अटी टाकण्यात आल्या होत्या. त्यापैकी एका अटीमध्ये २ फुअ उंचीचे क्ले मॉडेल सादर करणे बाबत कळविले असता त्यानुसार उपरोक्त दरपत्रक धारकांनी क्ले मॉडेल सादर केले होते. प्राप्त क्ले मॉडेल पैकी सर्वात उत्कृष्ट क्ले मॉडेलला दरपत्रके स्विकृतीसाठी प्राधान्य दिले जाईल अशीही अट होती. सदर क्ले मॉडेलपैकी मे.मडिलगेकर्स आर्टस् स्टुडिओ यांनी सदर केलेल्या क्ले मॉडेलला सदर मुर्तीची निवड करणेसाठी स्थापन केलेल्या समितीने व मा.आयुक्त यांनी मुर्तीस पसंती देवून त्यांचे दर मान्य केलेले आहेत.

तरी मे.मडिलगेकर आर्टस् स्टुडिओ यांचेकडून सदरील मुर्ती रक्कम रू.५२.८० लक्ष च्या किंमतीत तयार करून घेणेबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यान येथे भगवान गौतम बुध्द यांची ध्यानस्थ मुद्रेतील मुर्ती बसविणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या दरपत्रकानुसार व उत्कृष्ट क्ले मॉडेलला निवड समितीने पसंती दिल्यानुसार मे.मडिलगेकर आर्टस् स्टुडिओ यांचेकडून सदरील मुर्ती रक्कम रू.५२.८० लक्ष च्या किंमतीत तयार करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४ :**

उप आयुक्त (सिडको), महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००९-२०१० साठी चिकलठाणा आठवडी (शुक्रवार) बाजार शुल्क वसुलीसाठी दि.१८-२-२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता जाहीर लिलाव ठेवण्यात आला होता. परंतु सदर लिलावात भाग घेण्यासाठी कोणीही न आल्याने अल्प मुदतीची जाहीर लिलाव सूचना स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्दी करून दि.२५-२-२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता जाहीर लिलाव ठेवण्यात आला होता.

या बाजाराची आधारभुत किंमत रू.१०,३४०/- एवढी ठेवण्यात आली होती. दि.२५-२-२००९ रोजीच्या जाहीराती नुसार लिलावात बोली बोलण्यासाठी फक्त एकच व्यक्ती नामे श्री.मोहन यादवराव दाभाडे, रा.गांधीनगर (बहादुरपूरा) औरंगाबाद हजर होवून प्रती बाजार रक्कम रू.८,१११/- मध्ये बाजार शुल्क वसुलीचा ठेका घेण्यात येत असल्याचे लेखी कळविले आहे. तसेच प्रशासनातर्फे दोन आठवड्यातील बाजारासाठी आठ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून दि.१३-२-२००९ रोजी रक्कम रू.५८७०/- व दि.२०-२-२००९ रोजी रू.७,१०५/- इतके वसूल झालेले आहेत.

तरी श्री.मोहन यादवराव दाभाडे यांनी रक्कम रू.८,१११/- प्रती बाजार मध्ये चिकलठाणा आठवडी बाजार शुल्क वसुलीचा ठेका देण्याचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००९-२०१० साठी चिकलठाणा आठवडी (शुक्रवार) बाजार शुल्क वसुलीसाठी लिलावात बोली बोलण्यासाठी आलेले श्री.मोहन यादवराव दाभाडे, रा.गांधीनगर (बहादुरपूरा) औरंगाबाद यांनी प्रती बाजार रक्कम रू.८,१११/- मध्ये बाजार शुल्क वसुलीचा ठेका घेण्याचे लेखी संमती दिल्यानुसार त्यांना रक्कम रू.८,१११/- प्रती बाजार मध्ये चिकलठाणा आठवडी बाजार शुल्क वसुलीचा ठेका देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ई व फ) यांनी प्रस्ताव दिला की, प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील म.न.पा. च्या मोकळ्या जागा विकसीत करण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.२०,९७,४५४/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र.४६ दि.२०.१२.२००७ अन्वये मान्यता प्राप्त झालेली आहे. त्यानुसार सदर कामाकरीता निविदापत्रके मागविली असता (फेर निविदा) निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन कोरी निविदापत्रके विकल्या गेली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील दोनही निविदापत्रके दर भरून प्राप्त झाली. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. श्री.काझी मोहंमद फारूक मो. ईस्माईल ०.७८६% कमी दराने

२. मे. तुळजाई कन्स्ट्रक्शन ४०.५% जास्त दराने

वरील प्राप्त निविदापत्रकापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.७८६% कमी दराची श्री.काझी मोहंमद फारूक मो. ईस्माईल यांचे निविदापत्रक आहे.

तरी श्री. काझी मोहंमद फारूक मो. ईस्माईल यांचे अं.प. दरापेक्षा ०.७८६% कमी दराचे निविदापत्रक विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.८७ उल्कानगरी येथील म.न.पा. च्या मोकळ्या जागा विकसीत करण्याच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.७८६% कमी दराची श्री. काझी मोहंमद फारूक मो. ईस्माईल यांची अं.प. दरापेक्षा ०.७८६% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र. ५० मधील एलोरा डायग्नोस्टीक ते मोतीवाला नगर या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या २००८-०९ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,९९,९२१/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता मिळाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

१. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी ४.९९% जास्त दराने

२. एम. ए. सिद्यीकी ८.८६% जास्त दराने

वरील प्रमाणे प्राप्त निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची म्हणजेच अं.प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा असून मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदर कामाची सर्वात कमी दराची व अं.प. दरापेक्षा ४.९९% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ५० मधील एलोरा डायग्नोस्टीक ते मोतीवाला नगर या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सुल ते कोलठाणवाडी व पिसादेवी या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी सा.बां.खात्याच्या २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१९,९९,८००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समितीची मान्यता मिळाली असून त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागविण्यात आल्या असता एकूण दोन निविदा विक्री झाल्या व दोन निविदा दर भरून प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त निविदांचा तपशील खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. एम. ए. सिद्यीकी | ८२.००% जास्त दराने |
| २. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ८८.००% जास्त दराने |

वरील प्रमाणे प्राप्त निविदानुसार तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक एम.ए.सिद्यीकी यांचेशी दराबाबतच्या झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम अं.प.दरापेक्षा २८% जास्त दराने करण्यास संमती दर्शविली आहे. त्यास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समिती सभेसमोर मंजुरीस्तव सादर करण्याची शिफारस केलेली आहे.

त्यानुसार सदर कामासाठी सर्वात कमी दराची व अं.प. दरापेक्षा २८% जास्त दराची एम. ए. सिद्यीकी यांची निविदा विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हर्सुल ते कोलठाणवाडी व पिसादेवी या रस्त्याचे पुनःर्डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार सदरील काम एम. ए. सिद्यीकी यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महापालिकेचे बऱ्याच वर्षापासुन रिक्त असलेले शॉपींग सेंटरमधील गाळेअसून ते धुळ खात पडलेले आहेत. त्यापासून महापालिकेस कुठल्याही प्रकारचे उत्पन्न मिळत नाही. यापैकी एक सादिया टॉकीजच्या मागील बाजुस मिरां सलामी व्यापारी संकुल आहे. तेथील अनेक दुकाने रिकामेच पडून आहेत. त्यापासून काहीही उत्पन्न मिळत नाही. सदर व्यापारी संकुलातील 'दुकान क्र. ७ बी' भाडेतत्वावर मिळण्यासाठी श्री.अफसरखान अजीज खान यांनी विनंती केलेली असून त्यांना दुकान भाडेतत्वावर दिल्यास महापालिकेस उत्पन्न मिळू शकेल. करीता श्री.अफसरखान अजीज खान यांनी विनंती केल्यानुसार सादिया टॉकीज मागील मनपाच्या मिरां सलामी व्यापारी संकुलातील 'दुकान क्र. ७-बी' हे दुकान त्यांना भाडेतत्वावर देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : रविकांत गवळी अनुमोदक : सतीश कटकटे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बऱ्याच वर्षापासुन सादिया टॉकीजच्या मागील बाजुस असलेल्या मिरां सलामी व्यापारी संकुल येथील रिक्त असलेल्या दुकानांपासुन मनपास काहीही उत्पन्न मिळत नाही. श्री.अफसरखान अजीज खान यांनी विनंती केल्यानुसार सादिया टॉकीज मागील मनपाच्या मिरां सलामी व्यापारी संकुलातील 'दुकान क्र. ७-बी' हे दुकान त्यांना भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.९४ गोविंदनगर, पगारीया कॉलनी, नवयुग कॉलनी, राजनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां.खात्याच्या सन २००५-०६ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन रक्कम रू.१२,९२,०००/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.२१८ दि.१३.२.०९ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असून सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | |
|---|---|
| १. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ८% जास्त दराने |
| २. ए.एस.कन्स्ट्रक्शन कंपनी | अं.प.दरापेक्षा ४५% जास्त दराने |
| ३. एम. ए. सिद्यीकी | अं.प.दरापेक्षा ५२.८६% जास्त दराने |

४. आदिनाथ कन्स्ट्रक्शन कंपनी अं.प.दरापेक्षा ६०% जास्त दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराची व अं.प.दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची आहे. मा.आयुक्त यांनी उक्त निविदा दरास दि.१८.२.०९ रोजी मान्यता दिली आहे. तरी मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं.प.दरापेक्षा ८% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र. ९४ गोविंदनगर, पगारीया कॉलनी, नवयुग कॉलनी, राजनगर भागातील रस्त्याचे डांबरीकरण करणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५० :**

मा.आयुक्त प्रस्ताव सादर करीत आहेत की, सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी प्रभाग क्र.१ ते ६ साठी ई-टेंडर द्वारे निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरील निविदा दिनांक २८-९-२००७ रोजी उघडण्यात आल्या होत्या व मा.स्थायी समितीच्या मंजुरीनुसार १ जुलै २००८ ते ३१ मार्च २००९ या सहा महिन्याच्या कलावधीकरीता प्रभाग निहाय खालील कंत्राटदारांना मुदतवाढ देण्यात आली होती.

| प्रभाग क्रमांक | कंत्राटदाराचे नांव | प्रभागाची किंमत रूपये | लावलेली बोली रूपये | एकूण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | भारत पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| २. | सचिन पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ३. | आर.डी. पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ४. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ५. | निलेश पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ६. | ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार संस्था | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| | एकूण - | | | **६,०३,१३२/- प्रति माह** |

**(सहा महिन्याची एकूण रक्कम रू.२४,१२,५२८/-)**

वरील कंत्राटदारांना दिलेल्या कार्यादेशाची मुदत दिनांक ३१ मार्च २००९ रोजी संपत असून व लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता केव्हापासुन लागणार व केंव्हा संपणार याचा बोध होत नसल्याने नविन निविदा काढणे शक्य होणार नाही. जर दि.३१.३.२००९ पर्यंत आदर्श आचारसंहिता न लागल्यास नविन निविदा काढण्याची कार्यवाही सुरू करण्यात येईल. करीता या अटीवर नागरीकांचे आरोग्य लक्षात घेता, पुर्वीच्याच दराप्रमाणे वरील कंत्राटदारांमार्फत सदरील काम करून घेण्यासाठी १ एप्रिल २००९ ते ३१ जुलै २००९ या चार महिन्यांची मुदतवाढ देण्यासाठी प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेत मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडको विभागासाठी विकेंद्रीभुत किटकनाशक व अळीनाशक फवारणी व फॉगींगसाठी नागरीकांचे आरोग्य व लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागण्याची शक्यता लक्षात घेता, सदरील काम पुर्वीच्याच दराप्रमाणे प्रस्तावात नमुद केल्यानुसार पुर्वीच्याच कंत्राटदारांमार्फत सदरील काम करून घेण्यासाठी १ एप्रिल २००९ ते ३१ जुलै २००९ या चार महिन्यांची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| प्रभाग क्रमांक | कंत्राटदाराचे नांव | प्रभागाची किंमत रूपये | लावलेली बोली रूपये | एकूण रक्कम रूपये |
|---|---|---|---|---|
| १. | भारत पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| २. | सचिन पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३. | आर.डी. पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ४. | पुर्णेश्वर पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ५. | निलेश पेस्ट कंट्रोल | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| ६. | ओंकारेश्वर सुशिक्षित बेरोजगार संस्था | **८४,९१५/-** | **१५,६०७/-** | **१,००,५२२/-** |
| | एकूण - | | | **६,०३,१३२/-<br>प्रति माह** |

(सहा महिन्याची एकूण रक्कम रू.२४,१२,५२८/-)

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३८ गांधीनगर येथील मिडल शाळेसमोर अंगुरीबाग, बंजारा कॉलनी, बापुनगर समाज मंदीरा समोरील गल्ल्यामध्ये कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे या कामाचे अंदाजपत्रक म.जी.प्रा./सा.बां. खात्याच्या सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन रू.१३,९८,८६३/- च्या अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभा ठराव क्र.४०३ दि.२८.२.०८ अन्वये मान्यता प्राप्त झालेली असुन सदर कामाच्या निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या असल्याचा अहवाल ई-टेंडरींग विभागाकडून प्राप्त आहे. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. इरम कन्स्ट्रक्शन कंपनी अं.प.दरापेक्षा १४.९% कमी दराने
२. टेंभुर्णीकर प्रल्हाद सुरेश अं.प.दरापेक्षा १२% कमी दराने
३. राणा कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा ८.१९% कमी दराने
४. संधु कन्स्ट्रक्शन अं.प.दरापेक्षा ०.१% कमी दराने

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.९% कमी दराची ईरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची निविदा आहे. मा.आयुक्त महोदय यांनी उक्त निविदा दरास दि.२६.२.०९ रोजी मान्यता दिली आहे. तरी ईरम कन्स्ट्रक्शन कंपनी यांची अं.प.दरापेक्षा १४.९% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३८ गांधीनगर येथील मिडल शाळेसमोर अंगुरीबाग, बंजारा कॉलनी, बापुनगर समाज मंदीरा समोरील गल्ल्यामध्ये कॉंक्रीट पेव्हर ब्लॉक बसविणे या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १४.९% कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड इ व फ) यांनी प्रस्ताव दिला की, मो.नक्षत्रवाडी येथील जुना सेप्टीक टँक तोडून नविन बांधणे व ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.१४,८९,५००/- च्या अंदाजपत्रकास विषय क्र.२०८ दि.९/२/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झालेली आहे.

सदरील कामाकरीता निविदापत्रके मागविण्यात आली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण फक्त एक निविदापत्रक विकल्या गेले व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील एक निविदापत्रक दर भरून प्राप्त झाले. त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

१. श्री.सय्यद वसीम नवाझ रझवी अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी दराने

वरील प्राप्त निविदापत्रकानुसार श्री.सय्यद वसीम नवाझ रझवी यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.७८% कमी दराचे निविदापत्रक आहे. तरी श्री.सय्यद वसीम नवाझ रझवी यांचे अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी कमी दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मो.नक्षत्रवाडी येथील जुना सेप्टीक टँक तोडून नविन बांधणे व ३०० मी.मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार श्री.सय्यद वसीम नवाझ रझवी यांची अं.प.दरापेक्षा १०.७८% कमी कमी दराची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सिडकोचे महापालिकेकडे हस्तांतरण झाले त्यावेळी सिडकोच्या मोकळ्या जागा मनपाकडे हस्तांतरीत करण्यात आल्या. यापैकी टी.व्ही.सेंटर रोड, सलीम अली सरोवर नजीक असलेली मजनुहिल येथील जागा आहे. मनपाने मजनुहिल येथील जागेवर स्वामी विवेकानंद उद्यान विकसीत केलेले असून त्याशेजारी मौलाना आझाद रिसर्च सेंटरची उभारणी केलेली आहे. मौलाना आझाद रिसर्च सेंटरच्या पश्चिम बाजूस अंदाजे दोन एकर जागा शिल्लक असून या जागेवर काही दिवसांपुर्वी अतिक्रमण झाल्यामुळे मनपाने जागेच्या संरक्षणास्तव कंपौड वॉल बांधलेली आहे. तरी देखील पुन्हा अतिक्रमण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मनपाच्या मालकीच्या जागेवर अतिक्रमण झाल्यास यापासून मनपास कुठलेही उत्पन्न मिळणार नाही.

सदरील जागेचा सध्या कुठलाही उपयोग मनपास होत नाही. सदरची जागा मेमन मायनॉरीटी एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी, एन-१, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद यांनी शाळेसाठी लिजवर घेण्याची तयारी दर्शविलेली आहे. ही जागा मेमन मायनॉरीटी एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी या संस्थेस नेहमीच्या अटी-शर्तीवर नियमाप्रमाणे भाडे आकारणी करून लिजवर/दीर्घ मुदतीच्या भाडेतत्वावर दिल्यास महापालिकेस लिज/भाड्यापोटी आर्थिक उत्पन्न मिळू शकेल आणि अतिक्रमण देखील होणार नाही. सदरील बाब धोरणात्मक निर्णयाची असल्यामुळे संस्थेस जागा देण्यास मंजुरी देऊन मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात यावी.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

सुचक : सतीश कटकटे अनुमोदक : सिताराम सुरे

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिडकोकडून मनपास हस्तांतर झालेली टी.व्ही.सेंअर रोड, सलीम अली सरोवर नजीक असलेली मजनुहिल येथील मौलाना आझाद रिसर्च सेंटरच्या पश्चिम बाजुस असलेली अंदाजे दोन एकर मोकळी जागा असून सदरील जागेचा सध्या कुठलाही उपयोग मनपास होत नसल्यामुळे आणि अतिक्रमण होण्याची शक्यता लक्षात घेता, सदरची जागा मेमन मायनॉरीटी एज्युकेशनल अँड वेल्फेअर सोसायटी, एन-१, टाऊन सेंटर, सिडको, औरंगाबाद या संस्थेस नेहमीच्या अटी-शर्तीवर नियमाप्रमाणे भाडे आकारणी करून लिजवर/दीर्घ मुदतीच्या भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. तसेच सदर बाब धोरणात्मक निर्णयाची असल्यामुळे संस्थेस जागा देण्यास मंजुरी देऊन मा.सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रसताव सादर केला आहे की, प्रभाग क्र. ई व ड अंतर्गत विविध ठिकाणी मुख्य रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामाचे सन २००७-०८ च्या जिल्हा दरसुची नुसार रू.१०.०० लक्ष चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन यास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण ५ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला ४ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. आदिनाथ कन्स्ट्रक्शन | ४.८५% जास्त दराने |
| २. मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन | ५% जास्त दराने |
| ३. एम. ए. सिद्यीकी | ७.८६% जास्त दराने |
| ४. राजेंद्रसिंग अजितसिंग | ९.५०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८५% जास्त दराची निविदा मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची असून मा.आयुक्त यांनी यास शिफारस करून मा.स्थायी समितीकडे सादर

करण्याचे आदेशीत केलेले आहे. त्यानुसार मे. आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची अं.प.दरापेक्षा ४.८५% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र. ई व ड अंतर्गत विविध ठिकाणी मुख्य रस्त्याचे डांबरी पॅचवर्क करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८५% जास्त दराची मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५५ :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉर्ड क्रमांक एन-२ मायानगर अभिनव सोसायटी, सिडको येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रूपये १९,९४,६३०/- एवढ्याचे अंदाजपत्रकास विषय क्र.१८१ दि.४.२.२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मान्यता प्राप्त झाली. सदरील कामासाठी ई निविदाद्वारे जा.क्र./१५१ दि.१६.२.२००९ अन्वये बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारीख व वेळेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली. ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री. एस. बी. साधवानी — १८% जास्त.

वरील प्राप्त निविदा श्री.एस.बी.साधवानी यांची असून १८% जास्त दराची असल्यामुळे मा.शहर अभियंता यांनी आदेशीत केल्यानुसार ठेकेदारासोबत दर कमी करणे बाबत वाटाघाटी करण्यात आल्या असता वाटाघाटी अंती ठेकेदाराने १७% जास्त या दराने काम करण्यास संमती दिली. त्यास प्रशासकीय मान्यता झालेली आहे.

करीता श्री.एस.बी.साधवानी यांची वाटाघाटी अंती ठरलेल्या १७% जास्त या दराने निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्रमांक एन-२ मायानगर अभिनव सोसायटी, सिडको येथे १०० व १५० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी प्राप्त झालेल्या निविदेनुसार निविदाधारक श्री.एस.बी.साधवानी यांचेशी झालेल्या वाटाघाटी अंती ठरल्यानुसार सदरील काम त्यांचेकडून अंदाजपत्रक १७% जास्त दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६ :**

कार्यकारी अभियंता (वॉर्ड ब व क) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.२ हर्सुल प्रभागात नवीन दवाखाना इमारत बांधण्याकरीता सा.बां.विभागाच्या सन २००६-०७ च्या जिल्हा दरसुची नुसार रक्कम रू.१३,००,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन मा.स्थायी समितीने विषय क्र.१९५ दि.४.२.२००९ अन्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार ई-निविदा विभागामार्फत निविदा मागविण्यात आल्या असता एकूण ३ निविदा विक्री झाल्या व स्विकृतीच्या तारखेला एकुण ३ निविदा दर भरून प्राप्त झाल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| १. जी. एम. हनुमंते | ४.९९% जास्त दराने |
| २. अमन असोसिएटस् | ५.७८६% जास्त दराने |
| ३. स.वसीम नवाज रझावी | २५.७८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा जी.एम. अनुमंते यांची असून मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीकडे सादर करणेस शिफारस केलेली आहे. त्यानुसार जी.एम.हनुमंते यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची निविदा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.२ हर्सुल प्रभागात नवीन दवाखाना इमारत बांधण्याकरीता प्राप्त झ ालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची जी. एम. हनुमंते यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव साद करीत आहेत की, वॉर्ड-ड प्रभागातील घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाईसाठी तीन व डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी तीन भागात अे, बी, सी असे विभाजन करून दि.१ सप्टेंबर २००६ पासुन खाजगीकरणाच्या माध्यमातून खालील कंत्राटदारांना १ वर्षासाठी काम दिले होते.

**साफसफाईचे काम -**

| भाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नांव | तारखेपर्यंत केलेले काम | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| ए | मे. ईश्वरलाल खरे | ६ महिने दि.३१.१.०९ पर्यंत | २०,१७,८१२.०० |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | १५ दिवस दि.१५.८.०८ पर्यंत | १,९०,४९२.०० |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन | ०९ दिवस दि.०९.८.०८ पर्यंत | १,१०,१५७.०० |
| | | एकुण ... | २३,१८,४६१.०० |

**डोअर टू डोअर कलेक्शन -**

| भाग | डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदाराचे नांव | तारखेपर्यंत केलेले काम | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| ए | जागृती इंटरप्रायजेस | ६ महिने दि.३१.१.०९ पर्यंत | १८,०९,९७२.०० |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | १५ दिवस दि.१५.८.०८ पर्यंत | १,१०,६३०.०० |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन | ०९ दिवस दि.०९.८.०८ पर्यंत | ८८,४४३.०० |
| | | एकुण ... | २०,०९,०४५.०० |

सदरील साफसफाईचे काम व डोअर-टु-डोअर कलेक्शनचे काम त्यांना दिलेले मुदत दि.३१ जुलै २००८ रोजी संपत असून प्रभाग अधिकारी प्रभाग 'ड' व स्वच्छता निरीक्षक यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार कंत्राटदारांनी त्यांच्या नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपर्यंत काम केले असल्यामुळे सदरील केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड-ड प्रभागातील घनकचरा व्यवस्थापन हाताळणी नियम २००० अंतर्गत साफसफाईसाठी तीन व डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी तीन भागात अे, बी, सी असे विभाजन करून खाजगीकरणाच्या माध्यमातून ज्यां कंत्राटदारांना काम दिले होते त्यांचेकडून प्रस्तावात नमुद संबंधीत कंत्राटदाराचे नांवासमोर दर्शविलेल्या तारखेपर्यंत काम करून घेतले असल्यामुळे सदरील केलेल्या कामास कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

**साफसफाईचे काम -**

| भाग | साफसफाईसाठी कंत्राटदाराचे नांव | तारखेपर्यंत केलेले काम | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| ए | मे. ईश्वरलाल खरे | ६ महिने दि.३१.१.०९ पर्यंत | २०,१७,८१२.०० |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | १५ दिवस दि.१५.८.०८ पर्यंत | १,९०,४९२.०० |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन | ०९ दिवस दि.०९.८.०८ पर्यंत | १,१०,१५७.०० |
| | | एकुण ... | २३,१८,४६१.०० |

**डोअर टू डोअर कलेक्शन -**

| भाग | डोअर-टू-डोअर कलेक्शनसाठी कंत्राटदाराचे नांव | तारखेपर्यंत केलेले काम | कंत्राटदारांना द्यावयाची एकुण रक्कम |
|---|---|---|---|
| ए | जागृती इंटरप्रायजेस | ६ महिने दि.३१.१.०९ पर्यंत | १८,०९,९७२.०० |
| बी | मोना लेबर सप्लायर्स | १५ दिवस दि.१५.८.०८ पर्यंत | १,१०,६३०.०० |
| सी | सेंटर फॉर डेव्हलपमेंट कम्युनिकेशन | ०९ दिवस दि.०९.८.०८ पर्यंत | ८८,४४३.०० |
| | | एकुण ... | २०,०९,०४५.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन २००९-१० या एका आर्थिक वर्षाकरीता प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खाद्य खरेदीसाठी ई-टेंडरद्वारा निविदा मागविण्यात आल्या होत्या. एकुण ७ निविदांची विक्री झा ाली होती. सदर निविदा उघडल्या असता कागदपत्रांची पुर्तता न केल्यामुळे निविदा उघडण्यात आल्या नाहीत.

त्यामुळे फेर निविदेद्वारे परत निविदा खरेदी केलेल्या सात निविदाधारकांना या विभागामार्फत कोरे निविदापत्रक देण्यात आले व मनपाचे लेखा विभागात दर भरलेले निविदा बंद लिफाफ्यात दोन लिफाफा पध्दतीने पेटीत जमा करणेस सुचित करण्यात आले. यासाठी एकुण ४ भरलेल्या निविदा प्राप्त झाल्या होत्या. पात्र निविदाधारकांचे निविदा उघडल्या असता त्याचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | दर प्रति किलो रू. |
|---|---|---|
| १. | श्री. अ. हमीद शे. हनीफ | रूपये ३७.०० |
| २. | श्री. अब्दुल करीम | रूपये ५१.५० |
| ३. | श्री. फेरोज खान कुरैशी | रूपये ४५.०० |
| ४. | श्री. सरफराज कुरैशी | रूपये ५२.०० |

तुलनात्मकदृष्टीने श्री.अ.हमीद शे. हनीफ यांचे दर रूपये ३७/- प्रति किलो हे सर्वात कमी नोंदविल्यामुळे या दरास मा.आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. मागील वर्षी (२००८-२००९) बीफ खरेदीचे दर रूपये २३/- प्रति किलो होते.

प्राणी संग्रहालयात वाघ, सिंह बिबटे, कोल्हे, लांडगे, तडस, मगर व उदबिल्ले असे एकुण २८ मांसाहारी प्राणी असुन प्राप्त सर्वात कमी दर रूपये ३७/- प्रति किलो या दरानुसार वार्षिक खाद्य खर्च रूपये २५,४७,८२०/- अपेक्षित आहे.

तुलनात्मक दरानुसार श्री.अ.हमीद शे. हनीफ यांची निविदा सर्वात कमी दराची असल्यावरून निविदा मा.सभागृहाचे विचारार्थ तथा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविण्याल्या प्रमाणे सन २००९-१० या एका आर्थिक वर्षाकरीता प्राणी संग्रहालयातील हिंस्त्र प्राण्यांकरीता लागणारे बीफ खाद्य खरेदीसाठी प्राप्त झालेल्या निविदांपैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व रूपये ३७/- प्रति किलो या दराची श्री.अ. हमीद शे. हनीफ यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, म.न.पा. कत्तल विरोधी पथक, अतिक्रमण हटाव पथक तसेच मोहल्ला सिल्लेखाना इतरत्र अनधिकृत जनावरांची कत्तल न होणे व तसेच मोहल्ल्यामध्ये कोणत्याही प्रकारचे चामडे, हाडे इत्यादी साठा करण्यात येवु नये करीता सदर ठिकाणी हत्यारी खाजगी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येवुन पडेगांव कत्तलखाना व इतर ठिकाणी सुरक्षा संबंधी एकुण २० हत्यारी सुरक्षा रक्षक, ०२ महिला सुरक्षा रक्षक व ०१ सुरक्षा पर्यवेक्षक असे एकूण (२३) सुरक्षा रक्षक तैनाती करीता ई-निविदाद्वारे जाहीर निविदा मागविले व माजी सैनिक कल्याण बोर्डाकडून दर मागविले असता खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहेत.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | प्राप्त दर |
|---|---|---|
| १. | मे.महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, खडकेश्वर | रूपये ५५३९.५६ |
| २. | माजी सैनिक कल्याण बोर्ड, औरंगाबाद | रूपये ९८५३.४० |

वरील दरापैकी कमी दर मे. महाराणा सेक्युरिटी यांचे प्रति हत्यारी सुरक्षा रक्षक (८ तासांकरीता) प्रतिमाह रूपये ५५३९.५६ दिले असता चर्चेस बोलावून मा.आयुक्त यांनी दर कमी करण्यास सुचविले. त्यानुसार संस्थेने प्रत्येकी हत्यारी सुरक्षा रक्षक (८ तासांकरीता) प्रतिमाह रूपये ५५००.०० मान्य केले आहे.

तरी तुलनात्मक कमी दर असलेली निविदा मे.महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स यांना दि.१/३/२००९ पासुन मा.आयुक्त यांचे मान्यतेने आदेशीत करण्यात आले असुन मा.स्थायी समितीचे मान्यतेनंतर याच दराने पुढील सन २००९-१० करीता सुरक्षा व्यवस्थेसाठी विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे म.न.पा. कत्तल विरोधी पथक, अतिक्रमण हटाव पथक तसेच मोहल्ला सिल्लेखाना इतरत्र अनधिकृत जनावरांची कत्तल न होणे व तसेच मोहल्ल्यामध्ये कोणत्याही प्रकारचे चामडे, हाडे इत्यादी साठा करण्यात येवु नये करीता सदर ठिकाणी हत्यारी खाजगी सुरक्षा रक्षक तैनात करण्यात येवुन पडेगांव कत्तलखाना व इतर ठिकाणी सुरक्षा संबंधी एकुण २० हत्यारी सुरक्षा रक्षक, ०२ महिला सुरक्षा रक्षक व ०१ सुरक्षा पर्यवेक्षक असे एकूण (२३) सुरक्षा रक्षक तैनाती करीता प्राप्त कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीअंती ठरल्यानुसार दि. १/३/०९ पासुन व सन २००९-१० करीता सुरक्षा व्यवस्थेचे काम मे.महाराणा सेक्युरिटी व लेबर सप्लायर्स, खडकेश्वर यांचे मार्फत प्रत्येकी हत्यारी सुरक्षा रक्षक (८ तासांकरीता) प्रतिमाह रूपये ५५००.०० या दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६० :**

कार्यकारी अभियंता (ई व फ) महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर केला आहे की, वॉर्ड क्र.९६ येथील जुन्या पुलाची उंची वाढविणे या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.३२,०६,१३६/- च्या अंदाजपत्रकास विषय क्र. १८० दि.४/२/२००९ अन्वये मा.स्थायी समितीची मंजुरी प्राप्त झाली असुन सदरील कामासाठी निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकुण तीन निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदरील तीनही निविदा दर भरून प्राप्त झाल्या असुन त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे.अमन असोसिएटस् | ४.९९% जास्त दर |
| २. | मे. हायवे कन्स्ट्रक्शन | २१.६८% जास्त दर |
| ३. | मे. अरबाज कन्स्ट्रक्शन | ६०.८६% जास्त दर |

वरील प्राप्त निविदापत्रका पैकी मे.अमन असोसिएटस् यांचे निविदाचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त असे आहेत. तरी मे.अमन असोसिएटस् यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराचे निविदापत्रक मा.स्थायी समितीच्या मंजुरीस्तव तथा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९६ येथील जुन्या पुलाची उंची वाढविणे या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची मे.अमन असोसिएटस् यांची निविदा स्विकारणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६१ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, दिल्लीगेटच्या पश्चिमेस नवीन तयार करण्यात आलेल्या रोडवर पोलसह पथदिव्यांची व्यवस्था करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सा.बां. विभागाचे विद्युत दरसूची २००७-०८ नुसार रू.१,३१,७२०/- चे तयार करण्यात आले आहे. या कामाचा खर्च शहरी विभाग डांबरी रस्ते तयार करणे या शिर्षकाच्या बचत रक्कमेतून करण्यात येत आहे. काम तातडीने करावयाचे आहे. मा.स्थायी समिती सभेमध्ये BPMC Act 5(2)(2) अंतर्गत प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर अंदाजपत्रकास मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केलेले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.1,31,720/- चे काम BPMC Act 5(2)(2) अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिल्लीगेटच्या पश्चिमेस नवीन तयार करण्यात आलेल्या रोडवर पोलसह पथदिव्यांची व्यवस्था करणे बाबत कामासाठी तयार केलेल्या र.रू.१,३१,७२०/- च्या अंदाजपत्रकास तसेच सदरील काम तातडीने करावयाचे असल्याने मुं.प्रां.मनपा अधिनियम १९४९ अनुसूची ड प्रकरण ५ चे नियम (२) (२) अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६२ :**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करीत आहेत की, वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरण करणे बाबत कामाचे अंदाजपत्रक सा.बां.दरसुची २००४-०५ नुसार रू.९,९९,२६३/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम ४.९८% जास्त दराने मे.श्री.ए.सी.कोठारी यांना कार्यादेश देण्यात आले होते. परंतु सदरील गुत्तेदार श्री.ए.सी.कोठारी यांनी हे काम न केल्यामुळे याच दरावर निविदा धारक क्र.३ मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांच्याकडून पुर्वीच्याच मंजुर दरानुसार मा.स्थायी समिती यांनी मान्यता दिलेली आहे.

सदर कामाची मान्यता घेताना रू.१०,४९,०००/- एवढ्या खर्चास मा.स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे. मात्र दरम्यानच्या काळात (अंदाजपत्रक बनविणे, टेंडर प्रोसेस करणे, पहिला गुत्तेदार रद्द करून दुसऱ्यास काम देणे ही सर्व मान्यता होणे व प्रत्यक्ष काम करण्यापुर्वी पाणी पुरवठा वाहिनीचे काम करणे व त्यानंतर प्रत्यक्ष डांबरीकरणाचे काम करणे) डांबरीकरणासाठी लागणारे साहित्याचे दर मोठ्या प्रमाणावर वाढल्याने व भाववाढ (Prize veriation) देणे बंधनकारक असल्याने कामाचे किमतीत वाढ झाली आहे. अंतिम किंमत रू.१९,११,५२४/- एवढी झाली आहे. ही जी वाढ झालेली आहे ती Prize veriation मुळे झालेली आहे. त्यास मान्यता मिळणेस्तव प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.९४ बन्सीलालनगर अंतर्गत विविध रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम पहिल्या गुत्तेदाराने न केल्यामुळे क्र.३ चे निविदाधारक मे.आदिनाथ कन्स्ट्रक्शन यांचेकडून पुर्वीच्या मंजुर दरानुसार (४.९८% जास्त) काम करून घेण्यास तसेच दरम्यानेचे कालावधीत डांबरीकरणासाठी लागणारे साहित्याचे दर वाढल्याने व भाववाढ (Prize veriation) मुळे कामाचे किंमतीत झालेली वाढ धरून अंतिम किंमत रू.१९,११,५२४/- एवढ्या रक्कमेस मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.७ भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामाचे सा.बां. विभागाचे सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.१९,९९,५५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.स्थायी समिती विषय क्र.२११ दि.२७.११.२००८ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. तद्नंतर या कामासाठी ई-निविदेद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता एकुण चार निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.चंद्राम एन. आशन्ना | अं.प.दरापेक्षा १४.७०% जास्त दराने |

| | | |
|---|---|---|
| २. | मे. अरोरा कन्स्ट्रक्शन | अं.प.दरापेक्षा १७.००% जास्त दराने |
| ३. | श्री.के.बी.पाथ्रीकर | अं.प.दरापेक्षा १८.२१% जास्त दराने |
| ४. | मे.मॉस्कॉट कन्स्ट्रक्शन कं. | अं.प.दरापेक्षा ३०% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अं.प.दरापेक्षा १४.७०% जास्त दराची निविदा श्री.चंद्रमा एन.आशन्ना यांची आहे. तरी निविदेतील बाबीचा (Item) बाजार भावानुसार तुलना केली असता सदर दरवाढ ही अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने येत आहे व ह्या दरास प्रशासकीय मान्यता प्राप्त झालेली आहे.

करीता श्री.चंद्रमा एन.आशन्ना यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराची निविदा कार्योत्तर मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.७ भिमनगर भावसिंगपुरा स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारकाशी झालेल्या वाटाघाटीनुसार सदरील काम श्री.चंद्रमा एन.आशन्ना यांचेकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त दराने करून घेण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३२ बुढीलेन जामा मस्जीद परिसरामध्ये दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") केला जातो त्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था विद्युत दिवे बसविणे आहे. सदर कामासाठी रक्कम रू.३,१६,४२५/- चे अंदाजपत्रक संबंधीत विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम तातडीने करण्याबाबत नागरीकांची मागणी आहे. सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : जावेद हसन खान अनुमोदक : मोमीन सफीया फिरदौस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३२ बुढीलेन जामा मस्जीद परिसरामध्ये दफनविधीच्या पुर्वीचा विधी ("नमाज-ए-जनाजा") केला जातो त्या ठिकाणी प्रकाश व्यवस्था विद्युत दिवे बसविणेच्या कामासाठी संबंधीत विभागाने तयार केलेल्या रक्कम रू.३,१६,४२५/- चे अंदाजपत्रकानुसार सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.३२ बुढीलेन जामा मस्जीद परिसरामध्ये दरवर्षी हज यात्रेसाठी संपुर्ण मराठवाड्यातून हज यात्रेकरू येऊन थांबतात. या ठिकाणी हज यात्रेकरूंचे दोन-तीन दिवस वास्तव्य असते. म्हणुन या ठिकाणी शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. तसेच दफनविधीच्या वेळी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित असतात त्यांचेसाठी देखील शौचालयाची आवश्यकता आहे. सदर कामासाठी रक्कम रू.५,००,०००/- चे अंदाजपत्रक संबंधीत विभागामार्फत तयार करण्यात आलेले आहे. सदरील काम तातडीने करण्याची गरज असून नागरीकांची देखील तशी मागणी आहे. सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यात यावे. करीता प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

सुचक : जावेद हसन खान अनुमोदक : मोमीन सफीया फिरदौस

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वॉर्ड क्र.३२ बुढीलेन जामा मस्जीद परिसरामध्ये दरवर्षी हज यात्रेकरूंचे दोन-तीन दिवस वास्तव्य असते. म्हणुन या ठिकाणी शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देणे तसेच दफनविधीच्या वेळी मोठ्या संख्येने नागरीक उपस्थित असतात त्यांचेसाठी देखील शौचालयाची आवश्यकता असल्याने सदर कामासाठी संबंधीत विभागने तयार केलेल्या रक्कम रू.५,००,०००/- चे अंदाजपत्रकानुसार सदरील काम तातडीने करण्याची गरज असून नागरीकांची देखील तशी मागणी आहे. सदरील काम तातडीने करावयाचे असल्यामुळे मुं.

प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये उपलब्ध ठेकेदारामार्फत अंदाजपत्रकीय दरावर काम करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६६ :**

प्रस्ताव सादर केला आहे की, चिकलठाणा आरोग्य केंद्र परिसर विकसीत करणे, अंदाजपत्रकीय रक्कम रू.२३.५० लक्ष चे काम कंत्राटदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत निविदा दरापेक्षा १८.४८% कमी दराने प्रगतीपथावर आहे. आरोग्य विभागाच्या आर.सी.एच. फंडामधून महानगरपालिका हद्दीतील विविध आरोग्य केंद्राच्या देखभाल दुरूस्तीसाठी रक्कम रू.१०.०० लक्ष इतका निधी उपलब्ध आहे. सदर निधीमधुन हर्षनगर, नारेगांव, कैसर कॉलनी, चिकलठाणा, नक्षत्रवाडी, बायजीपुरा इत्यादी आरोग्य केंद्राची दुरूस्ती करण्याचे कामाचे पुरवणी अंदाजपत्रक सा.बां.विभागाच्या सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रू.९,९९,०५५/- इतके + मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.२३.५० लक्ष असे एकुण सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.३३,४९,०५५/- इतके मान्यतेस्तव तसेच वाढीव काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत अंदाजपत्रकीय दराने BPMC Act कलम ५(२)(२) अन्वये करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरोग्य विभागाच्या आर.सी.एच. फंडामधून महानगरपालिका हद्दीतील हर्षनगर, नारेगांव, कैसर कॉलनी, चिकलठाणा, नक्षत्रवाडी, बायजीपुरा इत्यादी आरोग्य केंद्राची दुरूस्ती करण्याचे कामाचे पुरवणी अंदाजपत्रक रक्कम रू.९,९९,०५५/- + मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.२३.५० लक्ष असे एकुण सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.३३,४९,०५५/- यास मान्यता देण्यात येते. तसेच वाढीव काम या कामाचे मुळ कंत्राटदार मे.मोना कन्स्ट्रक्शन यांच्या मार्फत मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अन्वये करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र.०१ अंतर्गत हर्सुल गावामध्ये १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाचे तसेच सा.बां. विभागाची सन २००६-०७ च्या दरसुचीनुसार रक्कम रू.४९,४५,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असुन त्यास मा.सर्वसाधारण सभेचा ठराव क्र.११०३ दि.२०.९.२००७ अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे. तद्नंतर या कामासाठी ई-निविदाद्वारे निविदा मागविण्यात आल्या असता एकुण एक निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणे.

१. मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स - अं.प. दरापेक्षा १२९.९६% जास्त दराने.

वरील प्रमाणे एकच निविदा प्राप्त असुन ती मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अं.प.दरापेक्षा १२९.९६% जास्त दराची आहे. निविदेतील बाबीचा सन २००८-०९ च्या दरसुचीच्या नुसार तुलना केली असता तो दर १२४.०५% जास्त असा येतो. ह्या दरास मा.आयुक्त यांनी मा.स्थायी समितीची मंजुरी घेण्यासाठी शिफारस केली आहे.

करीता मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांची अं.प. दरापेक्षा १२४.०५% जास्त दराची निविदा मान्यतेस्तव तथा विचारार्थ प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे प्रभाग क्र.०१ अंतर्गत हर्सुल गावामध्ये १००, १५० व २०० मी.मी. व्यासाची डीआयके-९ जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता प्राप्त झालेल्या निविदानुसार सदरील काम मे.उदय इंजिनिअरींग वर्क्स यांचेकडून अं.प.दरापेक्षा १२४.०५% जास्त दराने करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिका हद्दीत सिवरेज ट्रिटमेंट प्लॉन्ट बांधणे करीता राज्य शासनाने "मराठवाडा विकास कार्यक्रम २००७" अंतर्गत वर्ष २००८-०९ व २००९-१० या दोन वर्षांसाठी रूपये ६.२५ कोटी अनुदान घोषीत केले असुन, त्यापैकी रूपये ३.१३ कोटी महानगरपालकेस प्राप्त झाले आहेत.

डॉ.सलीम अली सरोवराच्या परिसरात सिडको भागासाठी सिवरेज ट्रिटमेंट प्लॉन्ट बांधण्याचे प्रस्तावीत असून, या प्रकल्पाचा एकुण खर्च रूपये ६.२५ कोटी एवढा आहे. उर्वरीत अनुदान रूपये ३.१२ कोटी वर्ष २००९-

१० वर्षात प्राप्त होणे अपेक्षीत असून, महानगरपालिका हिस्सा म्हणुन २५% रक्कमेची अट वगळून संपूर्ण १००% अनुदान स्वरूपात रूपये ६.२५ कोटी पैकीचा उर्वरीत हिस्सा मिळणे बाबत शासनास विनंती करण्यात आली आहे.

यापूर्वी उक्त अनुषंगाने प्रकल्प संकल्पनार्थी (PMC) ची नेमणूक करण्यासाठी मे.फोट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडवायजरी सर्व्हीसेस, पुणे यांनी एकुण प्रकल्प खर्चाच्या ३% दराने प्रस्ताव दिला होता. सदर प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीसाठी (विषय क्रमांक ३६९ दिनांक १९.१२.२००८) ठेवला असता, सदरचा प्रस्ताव २% दराने मंजुर करण्यात आलेला आहे.

मात्र या २% मंजुर दराने काम करणे बाबत मे.फोट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडवायजरी सर्व्हीसेस, पुणे यांनी नकार दिला आहे. त्यामुळे एकुण प्रकल्प रक्कमेच्या २% दराने काम करणे बाबत मे.एस.बी.एस. ॲण्ड असोसिएट्स, औरंगाबाद यांना विचारणा केली असता त्यांनी लेखी पत्राद्वारे संमती दिली आहे. तसेच सदरची एजन्सी डॉ.सलीम अली सरोवराचे सौंदर्यीकरणाचे काम प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन करीत असल्याने त्यांना या प्रकल्पासाठी प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन वेळेवर सेवा देणे सोयीचे जाणार आहे.

त्यामुळे वर नमूद वस्तुस्थिती विचारात घेता मे. एस.बी.एस. ॲण्ड असोसिएट्स, औरंगाबाद यांची डॉ.सलीम अली सरोवर परिसरात ५ एम.एल.डी. क्षमतेचा प्लॉन्ट बांधणेसाठी एकुण प्रकल्प रक्कम रूपये ६.२५ कोटी रक्कमेच्या २% दराने प्रकल्प संकल्पनार्थी म्हणुन नेमणूक करणे योग्य वाटते. सदरच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांची मंजुरी प्राप्त झाली असून स्थायी समितीकडे प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर करणेस्तव त्यांनी शिफारस केली आहे.

तरी प्रस्ताव विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे डॉ.सलीम अली सरोवराच्या परिसरात ५ द.ल.लि. प्रति दिन क्षमतेचा मलनिःसारण प्रकल्प राबविण्याकरीता प्रकल्प संकल्पनार्थी (P.M.C.) म्हणुन मे.फोट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडवायजरी सर्व्हीसेस, पुणे यांच्या ऐवजी मे.एस.बी.एस. अँड असोसिएटस्, औरंगाबाद यांची या प्रकल्पाकरीता, प्रकल्प संकल्पनार्थी म्हणून नेमणूक करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. मे.फोट्रेस इन्फ्रास्ट्रक्चर ॲडवायजरी सर्व्हीसेस, पुणे यांनी प्रकल्पाच्या एकुण खर्चाच्या ३% दराने प्रकल्प संकल्पनार्थी म्हणून काम करण्यास स्थायी समिती सभा ठराव क्र.७० दिनांक २४.६.२००८ नुसार मान्यता प्रदान करण्यात आली होती. तथापी मे. एस.बी.एस. अँड असोसिएटस्, औरंगाबाद हे प्रकल्प खर्चाच्या २% दराने (सर्व कर मिळून) काम करण्यास तयार असल्यामुळे महानगरपालिकेचा खर्च एक टक्क्याने कमी होणार असल्याने त्यात महापालिकेचे आर्थिक हित साधले जात आहे. ही बाब विचारात घेता राज्य शासनाकडून प्राप्त होणाऱ्या मराठवाडा कार्यक्रम-२००८ मधील मलनिःसारण प्रकल्पाचे काम आणि त्या स्वरूपाची इतर कामे देखील मे. एस.बी.एस. अँड असोसिएटस्, औरंगाबाद यांचेकडून प्रकल्प खर्चाच्या २% दराने करून घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र.२६९:</u>**

अतिरिक्त शहर अभियंता प्रस्ताव सादर करत आहेत की, सिध्दार्थ उद्यानातील गर्डर पोल व ओव्हरहेड तारा काढणे व भुमीगत केबल चार्ज करणे या कामाचे सा.बां.खात्याच्या सन २००८-०९ च्या दरसुची नुसार रक्कम रू.४,५५,७५१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. या कामाचा खर्च सन २००८-०९ या आर्थिक वर्षात सिध्दार्थ उद्यान विकास या लेखाशिर्षातून करण्यात येत आहे. मा.प्राणी संग्रहालय सुधार समितीने शिफारस केल्यानुसार काम तातडीने करणे बाबत पर्यावरण संवर्धन अधिकारी यांनी सुचविले आहे.

करीता स्थायी समितीमध्ये मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२) अंतर्गत मंजुरी करीता प्रस्ताव सादर करणे बाबत सुचविले आहे. सदर अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेची मंजुरी घेणे बाबत आदेशीत केले आहे.

त्यानुसार उपरोक्त रक्कम रू.४,५५,७५१/- चे काम मुं. प्रां. मनपा अधिनियम १९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्याचा प्रस्ताव मान्यतेस्तव विचारार्थ सादर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सध्दार्थ उद्यानातील गर्डर पोल व ओव्हरहेड तारा काढणे व भुमीगत केबल चार्ज करणे या कामासाठी अंदाजपत्रक र.रू.४,५५,७५१/- चे काम तातडीने करणेस्तव मुं. प्रां. मनपा अधिनियम

१९४९ चे अनुसूची-ड प्रकरण ५ नियम (२)(२)अंतर्गत उपलब्ध एजन्सी मार्फत करून घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७० :**

उप आयुक्त (प्र.) मनपा, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी सावित्रीबाई फुले दत्तक योजने अंतर्गत महानगरपालिका शाळेत इयत्ता १ ते ७ वी वर्गात शिक्षण घेणाऱ्या मराठी व उर्दू माध्यमाच्या सर्व विद्यार्थीनींना दप्तर वाटप करावयाचे आहे.

सदर दप्तरांची खरेदी शासनाचे परिपत्रक क्रमांक एस.एस.ए.२००९/प्र.क्र.२६/प्रा.शि.४, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ दि.२२/१/२००९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार रेक्झीनचे तीन कप्पे "१२x१८" या प्रकारचे रू.१९०/- प्रति नग व निश्चित केलेल्या फर्म महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई-३२ यांच्याकडून अंदाजीत विद्यार्थीनी संख्या (३१.७.०८ ची स्थिती) साधारण १०,००० नग खरेदी करावयाची असल्यास रू.१९,००,०००/- खर्च येणार असून उक्त शासन दरानुसार खरेदीचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २००९-१० या शैक्षणिक वर्षासाठी सावित्रीबाई फुले दत्तक योजने अंतर्गत महानगरपालिका शाळेत इयत्ता १ ते ७ वी वर्गात शिक्षण घेणाऱ्या मराठी व उर्दू माध्यमाच्या सर्व विद्यार्थीनींना दप्तर वाटप करण्यासाठी शासनाचे परिपत्रक क्रमांक एस.एस.ए.२००९/प्र.क्र.२६/प्रा.शि.४, दि.२२/१/२००९ अन्वये निश्चित केलेल्या दरानुसार रू.१९०/- प्रति नग या दराने महाराष्ट्र स्टेट को-ऑप.कन्झ्युमर्स फेडरेशन लि. मुंबई-३२ यांच्याकडून खरेदी करण्यास व त्यासाठी लागणाऱ्या रक्कम रू.१९,००,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७१ :**

श्री.अशोक नारायण चावरीया, स्पीपर, वॉर्ड-क कार्यालय, मनपा औरंगाबाद यांची दोन देय वार्षिक वेतनवाढी कायमस्वरूपी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने थांबविलेल्या वेतनवाढी संदर्भात कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/१९१ दि.७/२/२००७ विरूध्द सादर केलेल्या अपीलावर विचार विनिमय करून निर्णय घेणे.

मा. सभापती : श्री.अशोक चावरीया, स्वीपर यांनी सादर केलेले अपील मंजुर करण्यात येते.

**ठराव:**

श्री.अशोक नारायण चावरीया, स्पीपर, वॉर्ड-क कार्यालय, मनपा औरंगाबाद यांच्या कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-१/२००७/१९१ दि.७/२/२००७ अन्वये, दोन देय वार्षिक वेतनवाढी कायमस्वरूपी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा रितीने थांबविण्यात आलेल्या वेतनवाढी पुर्ववत सुरू करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७२ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री साईराज सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत, औरंगाबाद ही नोंदणीकृत संस्था असून सुशिक्षित बेरोजगारांसाठी कार्य करणारी सामाजिक संस्था आहे. या संस्थेस स्वत:ची जागा नसल्यामुळे संस्थेचे कामकाज करण्यासाठी शहरात जागा मिळावी अशी विनंती संस्थेतर्फे करण्यात आलेली आहे.

हडको एन-९ येथील प्लॉट नं.१८ खुली जागा असून ९०० चौ.फुट आकाराची जागा उपलब्ध असून सदरील जागा संस्थेस भाडेतत्वावर दिल्यास संस्थेचे कामकाज चालविण्यासाठी कार्यालय बांधण्याकरीता या जागेचा उपयोग होईल. या कार्यालयातून संस्थेचे कामकाज होऊन सुशिक्षित बेरोजगारांना याचा लाभ मिळणार आहे. तरी प्रस्तावात नमुद केल्यानुसार श्री साईराज सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्थेस हडको एन-९ येथील प्लॉट नं.१८ खुली जागा असून ९०० चौ.फुट जागा महानगरपालिकेच्या अटी-शर्तीनुसार दीर्घ मुदतीच्या भाडेतत्वावर देण्याच्या प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

सुचक : सिताराम सुरे अनुमोदक : रविकांत गवळी

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सुशिक्षित बेरोजगारांसाठी कार्य करणारी नोंदणीकृत सामाजिक संस्था श्री साईराज सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था मर्यादीत, औरंगाबाद या संस्थेस हडको एन-९ येथील प्लॉट नं. १८ येथे उपलब्ध असलेली अंदाजे ९०० चौ.फुट आकाराची खुली जागा महानगरपालिकेच्या अटी-शर्तीनुसार दीर्घ मुदतीच्या भाडेतत्वावर देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७३ :**

अतिरिक्त शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रमानगर येथे जालना रोड ते नालंदा विद्यालय, पन्नालालनगर पर्यंतच्या रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामाचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन २००८-२००९ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून कामाचे अंदाजपत्रक रू.११,३५,२१०/- चे आहे. या कामाचा खर्च सन २००८-२००९ च्या अर्थसंकल्पातील पुनःडांबरीकरण या लेखाशिर्षकामधून करण्यात येणार आहे. सदरील कामाच्या अंदाजपत्रकास मा.आयुक्त यांनी शिफारस करून मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव ठेवणेसाठी आदेशीत केलेले आहे.

तरी रू.११,३५,२१०/- चे अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभेच्या मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे रमानगर येथे जालना रोड ते नालंदा विद्यालय, पन्नालालनगर पर्यंतच्या रस्त्याचे पुनःडांबरीकरण करणे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रू.११,३५,२१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

"राष्ट्रगीता"नंतर सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषीत केले.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**स्थायी समिती सभा**

**कार्यक्रम पत्रिका क्रमांक (२४)**

**दिनांक :- २२/२/२००९**

## सुचना

**२५/२/२००९** रोजी दु.४.०० वा. आयोजित करण्यात आलेली स्थायी समितीची सभा **आता गुरूवार, दिनांक २६ फेब्रुवारी २००९ रोजी दुपारी ०४.०० वाजता 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह'** येथे आयोजित करण्यात आलेली आहे. सभेची कार्यक्रम पत्रिका यापुर्वीच वक्तशीर वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया तारखेतील बदल लक्षात घेऊन या सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद